


१६ मार्च ६८ । चाळीस पैसे

# माणूस

येथे नांदतात श्रमर्षी,
या भूमीला क्षरण नाही
येथे ज्ञान गाळते घाम,
विज्ञान दानव-शरण नाही
येथे कला जीवनमय,
अर्थाला अपहरण नाही
येथे भविष्य जन्मत आहे,
या सीमांना मरण नाही !

बाबा आमटे



समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : सातवे : अंक : बेचाळीसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

---

**स. न.** मार्च २

'अन्नस्वतंत्रता संचलनात भाग घेण्याची इच्छा मनातच दडपून टाकावी लागली. कारण व्यवसायाचा व्याप व काळजी. पण संचलन सुरू झाल्यापासून 'प्रतिपच्चद्ररेखेव' होणारी प्रगती वाचून समाधान मानतो. २ मार्च अंकातील 'त्यांच्या ऋणातून मुक्त होण्याकरता'– ही कल्पना फार आवडली. खरच त्यावेळी आम्ही फार लाचार बनलो होतो. तस पाहिलं तर माणूस ऋणातून कधीच मुक्त होत नसतो, म्हणून अंशत: मुक्त होण्याची कल्पना पटली. **अरविंद भंडारे**, मुंबई

'तू एकला चालोरे' या रविंद्राच्या आदेशाप्रमाणे निघालेल्या कैलास ते सिंधुसागर संचलनाचा वृत्तांत वाचला; पण इतरांप्रमाणे नाविन्य वाटले नाही. उलट आपल्या सारख्या उत्साही सेवाभावी व उपक्रमशील माणसाची शक्ती उपेक्षिली जाणार व शेवटी आपल्या पदरी निराशा येणार याचे वाईट वाटले. सिंधुसागरापर्यंत आल्यावर भेट घेण्याची मात्र इच्छा आहे.

**रघुवीर पाटील**, मुंबई

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण,
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९


प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# प्रतिपच्चंद्ररेखेव

## ५

'आम्ही आता लवकरच
खिस्ती धर्मात जाणार.
आमचे सर्व नातेवाईक
खिस्तीच आहेत.'


सुभळी बुद्रुकचे बाबुराव दादा पवार आणि दादा रघू पवार आपली हकीकत सांगत आहेत.



शेवगाव ते नेवासे अशा हकीकती गावोगाव कानी पडत होत्या, काही ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन या हकीकतीमधील खरेखोटे संचलनातील कार्यकर्ते तपासून पाहात होते.

दि. १३ फेब्रुवारी. मुक्काम भायगाव— जेथे वीस वर्षांपूर्वी बोटावर मोजण्याइतकेच ख्रिस्ती होते तेथे ही संख्या आता सहज शंभर—सव्वाशेच्या घरात असेल. कुणीतरी एक अर्जुन बोलाजी सौदागर गावात चर्च हवे म्हणून एका ब्रिटिश मिशनकडे अर्ज करतो. मिशनतर्फे लगबगीने काम सुरू केले जाते.

**भराभर माणसे कामाला लावली जातात.**



प्रथम मुख्यत: हरिजन समाजातली. पुढे पुढे तथाकथित वरच्या समाजातलीही. रोजगार मिळतो, धान्य मिळते.

माणशी दर आठवड्याला बारा किलो धान्य मिळावे म्हणून आमचे आमदार–नामदार विधान सभेमध्ये कंठशोष करीत असतात.

येथे कामावर असलेल्या प्रत्येक मजुराला या प्रमाणात चांगले धान्य कधीपासूनच वाटले जाते आणि शिवाय आठवड्याला एक लीटर तेल.

त्यामानाने काम थोडे, मामुली.

'अहो! चार टोपल्या टाकल्या, थोडे इकडचे तिकडे केले की, इतके सर्व पदरात पडत असेल तर कोण नाही अशा कामावर जाणार!' गावकरी सांगत होते.

काम करणाऱ्यांवर धर्मांतराची सक्ती होते असे नाही. पण जे धर्मांतरित आहेत त्यांची प्रगती पाहून, त्यांना सहज मिळणाऱ्या सुखसोई व सवलती पाहून इतरांनाही त्यांचे अनुकरण करावेसे वाटते; अनुकरणाची साथ हळूहळू फैलावतेच. मग अधूनमधून एखाद्या धार्मिक समारंभाचे आयोजन होते, त्यात ही सर्व मंडळी सहभागी होतात. केली जातात.

यानंतरची पायरी.

साप्ताहिक प्रार्थना सभा.


काहींचे मार्ग अगदी वेगळे.

चर्च बांधण्याऐवजी रस्ते करणे, तळी खोदणे, विहिरी काढणे यांवर विशेष भर. हल्ली एकट्या नगर जिल्ह्यात साठ गावांतून अशा तऱ्हेची कामे सुरू आहेत. १५० विहिरी एका वर्षात पूर्ण झाल्या. शेतकऱ्यांना बी–बियाणे, औषधे, खते अगदी दक्षतेने, वेळेवर पुरवली जातात. यासाठी सरकारसारखीच एक यंत्रणा उभी आहे. दहा गावांना मिशनचा एक ग्रामसेवक असतो. आणि अनेक ठिकाणी सरकारच्या कामचुकार ग्रामसेवकांऐवजी या मिशनच्या वेळच्या वेळी मदत पुरवणाऱ्या ग्रामसेवकांवर गावकऱ्यांचा अधिक विश्वास बसतो.

भूमिहीन हरिजनांना रोजगार, धान्यवाटप, तेल वगैरे. जमीनवाल्या गावकऱ्यांना विहिरीसाठी कर्ज, खते, औषधपाणी इत्यादी.

महाराष्ट्रात १९५१ साली चार लाख, तेहतीस हजार, दोनशे नव्वद ख्रिश्चन लोकसंख्या होती. १९६१ साली ती पाच लाख, साठ हजार, पाचशे चौऱ्याणव झाली. या दहा वर्षांत महाराष्ट्रातील ख्रिश्चनांची वाढ २९·३८ टक्क्यांनी झाली तर याच कालात महाराष्ट्रातील हिंदूंची वाढ केवळ १३·५८ टक्के.

अन्नमंत्री श्री. जगजीवनराम एकदा हैद्राबाद येथे जाहीर सभेत म्हणाले होते—"हैद्राबाद व मध्यप्रदेश या भागांत अशी सामुदायिक ख्रिस्तीकरणे सतत चालली आहेत. ह्या ख्रिस्तीकरणाच्या व्यवहाराशी मी स्वत: गेली पंचवीस वर्षे झगडत असून, या कालात एकदा ख्रिस्ती झाल्यामुळे इतस्तत: उद्ध्वस्त स्थितीत काळ कंठीत असलेल्या सात सहस्र हरिजनांना परत हिंदुधर्मात आणले आहे.... आपले लोक या विषयात अज्ञानी आहेत. एका पक्षी काही सामाजिक अन्यायामुळे तर दुसऱ्या पक्षी ख्रिस्ती



**श्री. पालवे यांच्या समवेत.**

मिशनऱ्यांनी दाखविलेल्या विलोभनाला बळी पडून आपला हिंदुधर्म पालटण्याकरिता ते वळविले जातात" –दिनांक २७–१०–१९५८

लोकसभापती श्री. अनंतशयनम् अय्यंगार एकदा पाटणा येथे जाहीर सभेत म्हणाले होते—

" हिंदुधर्मातील लक्षावधी लोक मुसलमान झाले म्हणून पाकिस्तान अस्तित्वात आले. त्याचप्रमाणे जर मोठ्या प्रमाणात हिंदूंचे ख्रिस्ती मिशनऱ्यांकडून होत असलेले ख्रिस्तीकरण असेच चालू राहिले तर भारताचे अधिक तुकडे होऊन येथे एखादे ख्रिस्तीस्थान निर्माण होईल अशी मला भीती वाटते. भारतातील परके ख्रिस्ती मिशनरी आपल्या कार्याकरिता प्रतिवर्षी जवळजवळ तीस कोटी रुपये खर्च करीत आहेत" –– दिनांक २७–११–१९६१.

१९४१ साली भारतात ख्रिश्चनांची लोकसंख्या त्रेपन्न लक्ष होती.

१९६१ साली ही संख्या एक कोटी, सात लक्षांचे वर गेल्याचे शिरगणतीत नमूद आहे.

श्री. मालवे, दि. बा. मोकाशी यांना दिलासा देत होते—

"आम्ही धर्मांतराला प्रोत्साहन देत नाही. आम्ही १०० टक्के राष्ट्रीय आहोत."

मोकाशींनी त्यांना सांगून टाकले––

" तुमची गोष्ट सोडा. सर्व हिंदुस्थानात काय चालले आहे ते पाहा. वर काय चालू आहे हे तुम्हांला तरी कसे कळणार ! "

संचलन संगमनेरच्या जवळपास येऊ

लागले. नेवासे ते श्रीरामपूर-लोणी या बागायत भागात या मिशनरी हकीकती विशेष कानावर आल्या नाहीत.
आता पुन्हा त्यांचे प्रमाण वाढले आहे. मनमाडच्या फादर फेररचे हातपाय येथपर्यंत पोचलेले दिसतात !
हा सगळा पैसा येतो कुठून !
हे धान्यवाटप कसे चालते !
अनेकांच्या मते यालाही कारण

**परदेशची अन्नमदत**

**पी. एल्. ४८० करार**

काही व्यवहार राजरोसपणे चालू असतात. बरेचसे व्यवहार चोरून, गुप्त मार्गाने उरकण्यात येतात.
यामुळे सगळेच ख्रिश्चन होतात असे नाही. पण 'unbaptised Christians' किंवा 'Christians without Christ' असे ज्यांना मिशनरी प्रचारक म्हणतात तो अवलंबित व लाचार वर्ग मात्र आपल्या इकडे झपाट्याने वाढतो आहे. मनमाड येथील फादर फेरेरविषयी येथील एका स्थानिक वृत्तपत्रात एकजण लिहितो–
'फादर प्रचंड प्रमाणात शेतकऱ्यांना मदती वाटीत असतो.'
या मदती मिळविण्यासाठी फादरने लेख, भाषणे, फिल्म्स वगैरे प्रकारचा प्रचार परदेशांत करण्याची यंत्रणा उभारली असून फादरचे दारावर लाचारीने बसलेल्या शेकडो शतकऱ्यांचे फोटो, तसेच फादरच्या पायांवर लोटांगण घेणाऱ्या कुटुंबांचे फोटो, फादरची मदत आनंदाने स्वीकारणाऱ्या व फादरचे वाटेकडे बुभुक्षित नजरेने डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांच्या फिल्म्स, त्याचप्रमाणे स्वतःच्या स्वार्थासाठी फादरला प्रत्यक्ष परमेश्वर ठरवणाऱ्या तथाकथित लाचार पुढाऱ्यांची, फादर गौरवाची भाषणे टेपरेकॉर्ड करून परदेशी पाठवतो व तिथल्या अनेक संस्था भूतदयेने प्रेरित होऊन मदत पाठवतात.

**मदत मदत मदत**

**भिकेला देण्यात आलेले एक सोज्वळ नाव......**

**एक किळसवाणी वस्तुस्थिती.**

# अन्न स्वतंत्रता संचलन

## संचलन कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| दि. ९ | मार्च | सिन्नर |
| दि. १० | मार्च | शिंदे |
| दि. ११ | मार्च | कुंदेवाडो |
| दि. १२ | मार्च | नासिक रोड |
| दि. १३ | मार्च | नासिक |
| दि. १४ | मार्च | नासिक |
| दि. १५ | मार्च | वेल्होळी |
| दि. १६ | मार्च | वाडीवरे |
| दि. १७ | मार्च | घोटी |
| दि. १८ | मार्च | इगतपुरी |
| दि. १९ | मार्च | कसारा |
| दि. २० | मार्च | खर्डी |
| दि. २१ | मार्च | अटगाव |
| दि. २२ | मार्च | शहापूर |

कच्छनंतर आता कच्छ-थिवु. कच्छचे रण हा जसा ओसाड प्रदेश तसेच हे छोटेसे बेटही निर्जन आहे. कच्छ-थिवु हे बेट भारत आणि सिलोन यांच्या दरम्यानच्या पाल्कच्या सामुद्रधुनीत उभे आहे. भारताच्या मालकीच्या या बेटाचा सिलोनने कधी ताबा घेतला याचीही आपल्या सरकारला माहिती नव्हती. त्यातूनही हा प्रकार घडला आहे हे कळल्यानंतर तरी सरकारने जागे व्हावयास हवे होते. परंतु जाग येणे हा प्रकार आपल्या राज्यकर्त्यांच्या बाबतीत संभवतच नाही याचे गेल्या वीस वर्षांत असंख्य पुरावे आहेत. लोकसभेमध्ये विरोधी पक्षीय सदस्यांनी जेव्हा या प्रकाराकडे सरकारचे लक्ष वेधले, तेव्हा कोठे हे असे काही तरी झाले आहे, याची आडवळणाने का होईना सरकारला कबुली द्यावी लागली.

परंतु ही कबुली देतानाही शब्दांचा कीस काढण्याची सरकारची जुनी सवय कायम आहे याचा प्रत्यय आला. मागे चीनच्या अक्साई चीनमधील कारवायांना आक्रमण म्हणावयाचे की, अतिक्रमण म्हणावयाचे यासंबंधी त्या वेळचे संरक्षणमंत्री आणि पंडित नेहरूंचे प्रमुख सल्लागार श्री. कृष्ण मेनन यांनी असाच घोळ घातला

# दिल्ली दरबार

होता. आताही तोच प्रकार घडला. सिलोनने ते बेट व्यापले असले तरी त्यावर ताबा सांगितलेला नाही असा गुळमुळीत खुलासा करून आपल्या प्रधानमंत्र्यांनी या प्रश्नाची बोळवण करण्याचा प्रयत्न केला. परंतु विरोधक गप्प बसत नाहीत असे आढळून आल्यानंतर, कच्छ-थिवुबाबत काय घडले याचा त्रोटक वृत्तांत सादर करण्यात आला.

या कच्छ–थिवु–प्रकारासंबंधी केंद्रीय मंत्रिमंडळाची प्रतिक्रिया काय आहे असा प्रश्न काही वार्ताहरांनी परराष्ट्रीय खात्यातील एका अधिकाऱ्याला विचारला असताना तो म्हणाला की, ' ही एक अत्यंत क्षुल्लक घटना आहे असे आम्ही (केंद्रीय मंत्रिमंडळ पण) मानतो. विरोधक उगाचच या प्रश्नाचा बाऊ करीत आहेत. म्हणजे काय गंमत आहे पाहा ! आपल्या मालकीचा भूप्रदेश जबरदस्तीने हिसकावून घेणाऱ्या सिलोनबाबत मौन आणि हा अवघड विषय काढाल म्हणून विरोधकांना दमबाजी असा हा खाक्या आहे. घरच्याला लाथा आणि दारच्याला माथा या परधार्जिण्यावृत्तीचे भारत सरकारने पुन्हा एकदा प्रदर्शन घडविले आहे आणि

तेही चीन, पाकिस्तानसारख्या उद्दामखोर राष्ट्रांच्या बाबतीत नव्हे तर आपल्या सतरा राज्यांपैकी कोणत्याही एका राज्यापेक्षाही लहान असलेल्या सिलोनच्या बाबतीत आपल्या सरकारला गप्प बसावेसे वाटते, यावरून आपली भेकड आणि आत्मसंतुष्ट वृत्ति कोणत्या थरास पोचली आहे याचा बोध होतो. सिलोनसारखे टीचभर सरकार आपली कुरापत काढू शकते यातच आमच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेचा ढिसाळपणा दिसून येतो.

सर्वश्री मधु लिमये, अटलबिहारी बाजपेयी, नाथ पै प्रभृतींनी सरकारवर भीरुतेचा आरोप केला. तेव्हा राज्यकर्त्या पक्षाच्या सदस्यांना राग येणे साहजिक आहे. परंतु कम्युनिस्ट आणि मुस्लिम लीग या पक्षाच्या सदस्यांनाही हा विरोध समजू नये यावरून राष्ट्राच्या प्रतिष्ठेचा सवाल निर्माण होताच राष्ट्रनिष्ठ कोण आणि राष्ट्रद्रोही कोण याचा निराळा पुरावा शोधण्याची गरज पडत नाही. कच्छ आणि कच्छथिवु या दोन प्रकरणासंबंधी प्रजासमाजवादी, संयुक्त समाजवादी आणि जनसंघ हे पक्ष काँग्रस सरकारवर कडक टीका करीत असताना कम्युनिस्ट पक्षाने आणि

# प्रदेशदानाची आणखी एक संधी

मुस्लिम लीगने संमत केलेले ठराव वाचण्याजोगे आहेत. 'आंतरराष्ट्रीय निवाडा मंडळाचा निर्णय भारत सरकारने मंजूर करावा' अशी शिफारस करणारे ठराव या दोन्ही पक्षांनी आपापल्या पक्ष–बैठकीत मंजूर केले आहेत.

कच्छ आणि कच्छाथिवु प्रकरणामुळे जसे काँग्रेस सरकारचे स्वाभिमानशून्य धोरण दिसून येते तसेच कम्युनिस्ट आणि मुस्लिमलीग या पक्षाना या भूमीच्या पावित्र्याची किंचितही दिक्कत नाही हेही आढळून आलेले आहे. कम्युनिस्ट पक्षाला या देशासंबंधी राष्ट्र म्हणून किंचितही आस्था नाही. उलट आपल्या हातात सत्ता यावी यासाठी या देशाचे जेवढे तुकडे होतील तेवढे त्यांना हवेच आहेत. कोणताही प्रादेशिक - वाद असो, तो चिघळलाच पाहिजे अशी तरतूद करण्यासाठी स्टॅलिन आणि माओ यांच्या या गावठी अवतारांची सतत धावपळ चाललेली असते. कम्युनिस्टांनी आपल्या भारत-प्रेमाचा कितीही गवगवा करो हा गवगवा म्हणजे लोकमानसात प्रवेश मिळविण्यासाठी त्यांनी पांघरलेले कातडे आहे हे ओळखून भारतीय राजकारणात या पक्षाला स्थान मिळणार नाही याची राष्ट्रवादी पक्षांनी एकत्र येऊन तरतूद करायला हवी.

## नवा भस्मासूर

जी गोष्ट कम्युनिष्टांची तीच मुस्लीम लीगची. भारताची फाळणी झाल्यानंतर हा पक्ष निष्प्रभ होईल अशी सर्वसाधारण कल्पना होती. परंतु आपल्या राज्यकर्त्यांच्या राष्ट्रघातक अशा उदार धोरणापायी या पक्षाला जीवदान मिळाले आणि प्रारंभी सर्वसार्थक मौन स्वीकारून बसलेल्या या जात्यंध पक्षाने भारतीय राजकारणात आपला विषारी वायू पसरविण्यास प्रारंभ केला आहे. कच्छ–निवाडा भारत सरकारने स्वीकारला पाहिजे असा ठराव करण्यासाठी बोलावलेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत मुस्लीम लीगने भारतात मुसलमानांवर अन्याय होत आहे असा कांगावा करण्यास प्रारंभ केला आहे. इतकेच नव्हे तर विधानसभांमध्ये आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये मुसलमानांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळण्यासाठी काही जागा राखून ठेवण्यात आल्या पाहिजेत अशी मागणी केली आहे. १९३७–३८ मधील मुस्लीम लीगचे ठराव पाहिले तर त्या ठरावातील भाषा आणि १९६८ मध्ये केलेल्या ठरावातील भाषा यातील साम्य चटकन लक्षात येते. त्या वेळीही मुस्लीम लीगच्या या भाषेची उपेक्षा झाली आणि आजही तशीच उपेक्षा होत आहे. १९३७ मध्ये मुस्लीम लीग पाकिस्तानची भाषा बोलत असताना हा विचार हास्यास्पद आहे असे म्हणणाऱ्या काँग्रेसलाच अवघ्या दहा वर्षांच्या आत फाळणीच्या योजनेला संमती द्यावी लागली. मते मिळविण्यासाठी मुसलमान समाजाला खुष करण्याच्या वादात आजचे सत्ताधारीही मुस्लीम लीगच्या नव्या मागण्यांची कुचेष्टा करीत असले तरी आजचे नेभळट धोरण असेच चालू राहिले तर मुस्लीम लीगचा भस्मासुर पुन्हा मानल्याशिवाय राहणार नाही.

परंतु आज तरी या गोष्टींची दखल घेण्याची कोणालाही गरज वाटत नाही. बेरुबाडी, अक्साई चीन आणि गिलिगट घालविणाऱ्या राज्यकर्त्यांना कच्छ आणि कच्छाथिवुबाबत फारसा विधिनिषेध न वाटणे स्वाभाविक आहे. व्हिएटनाममध्ये अमेरिकेने काय करावे आणि अरब राष्ट्रांबाबत इस्रायलने कोणते धोरण स्वीकारावे हे सांगण्याची तहान लागलेल्या आपल्या राज्यकर्त्यांना देशांतर्गत प्रश्नांची तड लावण्याची गरज भासू नये हे त्यांच्या आजवरच्या पडखाऊ धोरणाशी सुसंगत आहे. एकदा राष्ट्रीय स्वाभिमानाला तिलांजली दिली की, मग प्रत्येक कचखाऊ वृत्तीचे गोंडस भाषेत समर्थन करता येते. चीन, पाकिस्तान, सिलोन किंवा ब्रह्मदेश यांपैकी कोणत्याही छोट्या मोठ्या शेजाऱ्याने आमचा उद्दाम अधिक्षेप करावा आणि आम्ही तो निर्लज्जपणे सहन करावा ही आमच्या परराष्ट्रीय धोरणाची खरी शोकांतिका आहे.

— सदाशिव पेठकर

समीर

# विचार वारे

## ☐ न्यायाधीश आणि राजकारण

न्यायाधीशाने राजकारणाशी संबंध ठेवावा काय ? काही दिवसांपूर्वी भारताला येऊन गेलेले संयुक्त अरब गणराज्याचे सरन्यायाधीश आदल युनीस यांचे नि:संदिग्ध उत्तर : " नाही ! त्यांची खासगी मते काहीही असली तरी त्यांनी राजकारणापासून दूर राहिले पाहिजे. मी तर म्हणेन त्यांनी राजकारणी मंडळींशी सामाजिक संबधही ठेवू नयेत. त्यांना जे काही बोलायचे असेल ते त्यांनी कोर्टात बोलावे. न्यायाधीशांवर दडपण येण्याची खूपच शक्यता असते, व त्याचा त्यांच्या निर्णयावर परिणाम होऊ शकतो. वकिली हा पैशाच्या दृष्टीने चांगला व्यवसाय आहे. ईजिप्तमध्ये ८००० वकील आहेत. फारसा त्रास न घेता आणि चटकन श्रीमंत होण्याचा मोह न्यायाधीशालाही पडू शकेल. म्हणूनच कुठल्याही प्रकारच्या प्रलोभनापासून त्यांनी दूर राहणे आवश्यक आहे. "

## ☐ भारतीय चित्रकलेची अभारतीयता

कलेचा अभ्यास करण्यासाठी भारतात येऊन राहिलेले फ्रेंच कलाकार स्टीव्ह लेक्लर यांना पूर्वी भारतीय कलात्मकतेचे फार आकर्षण होते, पण इकडे आल्यावर त्यांची निराशा झाली आहे. फ्रान्समध्ये रेडिओवर सतारीचा कार्यक्रम ऐकल्यापासून त्यांच्यावर भारतीय संगीताने मोहिनी घातली आहे. प्राचीन भारतीय चित्रकलेतील " विश्वव्यापी " वैशिष्ट्यानेही त्यांना प्रभावित केले आहे. पण आधुनिक भारतीय चित्रकलेतील दिशा पाहून त्यांना धक्का बसला आहे. " भारतीय चित्रकार पाश्चिमात्यांचे अनुकरण का करतात ?" येथल्या आधुनिक चित्रकारांच्या कलाकृतीत भारतीयता आढळत नाही ही दु:खाची गोष्ट आहे.

## ☐ बालशस्त्रक्रियेच्या दोन बाजू

बाल-शस्त्रक्रिया ( पीडिॲट्रिक सर्जरी ) या विषयात आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कौशल्य असणारे ब्रिटिश सर्जन डॉ. वॉलेस डेनिसन नुकतेच दिल्लीमार्गे सायगावला गेले तेव्हा म्हणाले : युद्ध-काळात लष्करी डॉक्टर म्हणून मी खाटकाचे काम केले. मानवी हात–पाय कापण्याच्या " विध्वंसक शस्त्रक्रिये "कडे पाठ फिरवून त्यांनी लहान मुलावरील शस्त्रक्रियेत प्राविण्य संपादन केले. " आता माझी शस्त्रक्रिया विधायक

असल्याचे मला समाधान मिळते. निसर्गाने काही मुलांच्या शरीरात व्यंगे निर्माण केलेली असतात, व मी ती सुधारण्याचा प्रयत्न करतो." हिंदुस्थानांत एकाही हॉस्पिटलमध्ये पीडिॲट्रिक सर्जरीची विशेष व्यवस्था नाही ही खेदाची गोष्ट आहे. ब्रिटिश डॉक्टरांनी या असल्या शस्त्रक्रियेत बरीच प्रगती केली आहे. पण शस्त्रक्रिया केलेल्या मुलांची शरीरे कमरेपासून खाली लुळी राहतात. "म्हणजे आम्ही वाचविलेल्या शेकडो मुलांना पुढील आयुष्य जगण्यासाठी आर्थिक मदत लागणार. एवढी सुधारलेली शस्त्रक्रिया हिंदुस्थानला व इतर विकासेच्छुक देशांना परवडणार नाही. या शस्त्रक्रियेचा आर्थिक परिणाम त्यांना पेलवणार नाही."

## ☐ आर्थिक विकासाचे जागतिक धोरण

'उंक्टाड'च्या निमित्ताने सध्या दिल्लीत निरनिराळ्या देशांतून आलेल्या अर्थशास्त्रज्ञांची व वाणिज्यतज्ज्ञांची आंतरराष्ट्रीय गर्दी झाली आहे. त्यांच्या मेळाव्यात प्रकट झालेली व होत असलेली मते विस्ताराने देणे अशक्य असले तरी 'उंक्टाड'चे सहकार्यवाह डॉ. राउल प्रेबिश यांनी या परिषदेला सादर केलेला विचार–परिप्लुत अहवाल प्रातिनिधिक स्वरूपाचा समजता येईल.

या अहवालाचा मौलिक सिद्धान्त म्हणजे विकासाची समस्या ही "सर्वांची समान समस्या आहे; ती सोडविण्यासाठी सर्वांनी जबाबदारीचा सारखा वाटा उचलला पाहिजे, आणि आर्थिक विकासाचे जागतिक धोरण आखण्यासाठी दोन्ही बाजूंच्या मंडळींनी बरेच उपाय योजले पाहिजेत." सध्याचे 'तिसरे जग' स्वत:च्या विकासासाठी धडपडत आहे, पण उन्नत देशांजवळ आर्थिक व सामाजिक प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्याचे जे सामर्थ्य आहे ते या जगाजवळ नाही. म्हणून 'तिसऱ्या जगा'ला मदत करण्यासाठी हात पुढे करणे आर्थिकच नव्हे तर राजकीय दृष्टीनेही प्रगत देशांना हितकारक ठरेल. शिवाय प्रगत देशांजवळ आपल्या आर्थिक व सामाजिक उन्नतीच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्याची शक्ती असली तर अप्रगत देशांतील आर्थिक व सामाजिक संघर्षाचा प्रगत देशांवरही परिणाम झाल्याखेरीज राहत नाही. "म्हणून विकासाचे धोरण आखण्याची राजकीय आवश्यकता आहे."

पण या प्रश्नाला आर्थिक बाजूही आहे. ती म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या नवीन रचनेत प्रगत देशांबरोबरच प्रगतिमान देशांनाही स्थान मिळाले तर जागतिक व्यापाराची जोमाने वाढ होईल. औद्योगिक देशांना या शक्यतेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

आर्थिक विकासाचे जागतिक धोरण आखण्यासाठी काय केले पाहिजे? पहिली गोष्ट म्हणजे प्रगत देशांनी मागासलेल्या देशांचा माल आपल्याकडे आयात होऊ दिला पाहिजे. अर्थात अशा प्रकारे आपला व्यापार वाढविण्याची संधी मागासलेल्या देशांना मिळाल्यावर त्यांनी तिचा उपयोग करण्याची पात्रता दाखविली पाहिजे.

दुसरी गोष्ट म्हणजे प्राथमिक गरजेच्या वस्तूंच्या किमती स्थिर होणे हे केवळ मागासलेल्याच नव्हे तर औद्योगिक देशांच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे. सुधारलेल्या देशांनी एकत्र येऊन निरनिराळ्या व्यापारी संघटना स्थापन केल्या आहेत व त्यांच्यांत होत असणाऱ्या मालाच्या देवाण–घेवाणीवर जकातीचा निर्बंध जवळ जवळ मुळीच उरलेला नाही, तेव्हा मागासलेल्या देशांतून निर्माण होणाऱ्या मालावरच्या जकातीचा अंकुशही पूर्णपणे काढून टाकण्याची कल्पना आता अधिक सुलभतेने पसरू शकेल.

एखाद्या गरीब देशाने विकासाची पद्धतशीर योजना आखली तर त्याला आंतरिक द्रव्य–संचयाच्या जोडीला लागणाऱ्या पैशाची मदत करणे हे आंतरराष्ट्रीय धनको संस्था आणि समृद्ध देश यांच्या दृष्टीने 'अत्यंत उचित' ठरेल. मात्र याच्या जोडीला योजना आखणाऱ्या देशाने योजनेपासून होणाऱ्या उत्पन्नाचा वाढता भाग विकास–कार्यात गुंतविण्याचे आश्वासन दिले पाहिजे. यात एखाद्या देशाच्या अंतर्गत विकास–धोरणाच्या तपासणीचा नाजूक प्रश्न उभा राहतो. ही तपासणी योग्य आहे, पण ती त्रयस्थ तज्ज्ञांमार्फत करण्यात यावी.

आर्थिक सहकार्याचे सर्वंकष व सुनिश्चित धोरण आखणे याचा अर्थ असा नव्हे की अंतर्गत प्रयत्नांची आवश्यकता संपली. आंतरराष्ट्रीय सहकार्य हे राष्ट्रीय प्रयत्नाला पूरक असले पाहिजे.

अशा रीतीने विकास–कार्याच्या आंतरराष्ट्रीय धोरणाचे तीन पैलू आहेत. व्यापारी धोरण, आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य आणि अंतर्गत विकास-धोरण हे त्रिविध धोरण कायमचे ठेवण्याची आवश्यकता नाही; अप्रगत देशांना स्वतःच्या हिमतीवर आपला विकास साधण्याइतके बळ येईपर्यंतच हे धोरण ठेवावे. या संक्रमण–काळात "जी मदत त्यांना मदतीशिवाय चालायला मदत करणार नाही ती अखेर हानिकारकच ठरेल."

### ☐ रशियात मराठीचे शिक्षण

हिंदी अस्खलित बोलू शकणारे रशियन भाषा-तज्ज्ञ प्रा. गोसनॉव्ह यांनी थोड्या दिवसांपूर्वी भारत-यात्रेत दिलेली माहिती :

गेल्या काही वर्षांत सोविएत रशियात भारतीय भाषांची आवड वाढत चालली आहे. त्यामुळे बहुतेक प्रत्येक मोठ्या रशियन विश्वविद्यालयात भारतीय भाषा शिकविणारा निदान एकतरी विभाग असतो. लेनिनग्राड येथील विश्वविद्यालयात हिंदीच्या जोडीला मराठीचाही स्वतंत्रविभाग आहे. इतर संस्थांतून तामीळ, बंगाली, उर्दू व आणखी काही प्रमुख भारतीय भाषा शिकण्याची सोय आहे.

। रातराणी ।



# एक संध्याकाळ

। विजय तेंडुलकर ।

व्याख्यान. मुंबईतले कीर्ती कॉलेजच्या ग्रंथालयाच्या शेजाराने उगीच फार भारदस्त वाटणारे सभागृह. खुर्च्यांच्या हारी. त्यांतल्या बहुतेक तुरळक भरलेल्या. गंभीर चेहरे, गंभीर चर्चा, गंभीर चेहऱ्याचे हास्यविनोद आणि कुजबूज. समोर एक ओकेबोके टेबल आणि त्यामागे काही नुकत्याच खुर्च्या–याही उगीच फार गंभीर वाटताहेत. एकूण वातावरण एखाद्या अभ्यासजड, क्लिष्ट, एकसुरी व्याख्यानाची मागणी करणारे.

क्षणभर वाटते की मागल्या मागे पळून बाहेर जावे. जवळ तर दादर चौपाटीचा समुद्र आहे -- अगदी काही पावलांवर. तिथे संध्याकाळ पाण्यात आपले रूप न्याहाळते आहे. थोड्याच अवकाशात झपाटणारा सूर्यास्त होईल. नंतरच्या साकळत्या काजळीतही रक्तातून झिरपत राहणारा सूर्यास्त. संपूनही डोळ्यांपुढे



। कुसुमाग्रजांचा महामानव ।

आपले लालकेशरी आणि राखी वैभव नंतर कितीतरी वेळ निःशब्द कल्लोळांनी उधळीत राहणारा सूर्यास्त. जवळच तर हे सारे उपलब्ध आहे आणि व्याख्यान कसले ऐकायचे ?

पण तरी पाऊल मागे फिरत नाही आणि तेवढ्यात सभाही सुरू होते. अध्यक्षांच्या सूचनेवरून पुढल्याच रांगतल्या एका खुर्चीतला पाठमोरा, रुंद हाडापेराचा, उतार, मध्यम वयातला वाटणारा, तरतरीत काळाशार माणूस जागचा उठतो आणि अध्यक्षांबरोबर टेबलामागल्या खुर्चीत जाऊन बसतो. हे बाबा आमटे तर ! मी मनाशी म्हणतो. 'हा आत्ता' कुठल्या तरी लांबच्या प्रवासाहून परस्पर आल्यासारखा नूर

आहे. किंचित कलत्या मस्तकाला विलगून निरुंद कपाळावर उतरलेल्या पुष्कळ रुपेरी झालेल्या कुरळसर केसांना कंगव्याचा स्पर्श नाही. अंगातला स्वेटर घाईघाईने घातल्यासारखा किंवा काढता काढता विसरल्यासारखा एका बाजूने वर मुडपला आहे. खमीस आणि लेंग्याला प्रवासात येतो तसा मोठ्ठा बोंगा आला आहे.

हाच तो कवी कुसुमाग्रजांनी 'महामानव' म्हणून गौरविलेला माणूस – ज्याला पाहण्यासाठी मुद्दाम सारे व्याप झुगारून यावेसे वाटले, सूर्यास्त टाकून पावले या दडपल्या वातावरणातच घुटमळली.

हजारांत मिसळणाऱ्या या व्यक्तिमत्त्वात काहीतरी नजर वेधून घेणारे आहे. याची नजर – छोटया हसऱ्या चमकत्या डोळ्यांवाटे माणसे आणि माणसांपलीकडे काहीतरी झरझर चपळपणे पाहात राहणारी, शोधणारी, हेरणारी, हुडकून काढणारी, खुषीने फुलणारी.

अध्यक्ष ओळख करून देऊन म्हणतात, नुकत्याच मुंबईतल्या युवकांनी भरवलेल्या 'विध्वंसन–बंद' मेळाव्यानंतर या दिशेने त्यांनी आणखी काय करावे, काय करता येण्यासारखे आहे, याविषयी तुम्ही मार्गदर्शन करावे. तसेच सध्याच्या तुमच्या प्रकल्पाविषयीही येथे जमलेल्यांना काही माहिती सांगावी.

अध्यक्ष तरुण असल्याने फार थोडे बोलतात आणि मग कुसुमाग्रजांचा 'महामानव' उभा राहतो. भाषणाची तिळमात्र आगाऊ तयारी नसल्यासारखा क्षणमात्र अक्षरशः कोरा वाटतो. शब्दांसाठी आणि आशयासाठीही चाचपडतो. तोंडातल्या तोंडात बोलतो. काही एक ऐकू येत नाही. अध्यक्षही कान टवकारून राहतात. ऐकणारे चेहरे कुचंबून एकमेकांकडे पाहतात. मनात येते, अरेरे! तिकडे समुद्रावर काय मौज असेल!

पाहता पाहता शब्द त्याला भेटू लागतात. आशय फेर धरतो. सूर उंचावतो.आणि कधी ऐकले नव्हते असे काही तरी एकायला मिळते, त्याला व्याख्यान म्हणावे? की साधे असंबद्ध भाषण? की बौद्धिक? की स्वगत? की सुखसंवाद? एवढे.. खरे की, जे काही चालते ते सर्व साच्याबाहेरचे असते. मुक्त असते, आकारहीन असते. त्याला आगापिच्छा, मध्य, काहीएक नसते. त्याला सूत्रही नसते. एकच एक ओघही नसतो. खाचखळग्यातून स्वर वाट काढीत, सखल भाग भरून टाकीत कशाही धावत सुटलेल्या पाण्यासारखे काहीतरी समोर घडते. मध्येच अंतर्मुख प्रकट चिंतन, त्यातून एकदम अध्यक्षांनाच उद्देशून काही बोलणे, की लगेच श्रोत्यांसाठी काही प्रतिपादन आणि त्यातून पुन्हा प्रकट चिंतन किंवा अध्यक्षांशी बातचीत – असे उलटसुलट काहीही घडते. क्षणात स्वप्नरंजन, क्षणात रोखठोक व्यवहार, क्षणात अस्खलित इंग्रजी, क्षणात हिंदी तर क्षणात मराठी, एकदा आवेग तर एकदा तटस्थ विचार, एकदा ठाशीव प्रतिपादन तर एकदा काव्यात्म तरल गूढगुंजन – आणि हे सर्व असे थोडा वेळ चालले की ह्या साऱ्यांतून, काळचाशार

खडकातून एखादा गुप्त झरा उचंबळत वर येऊन खळाळ वहावा तसे एक सुरेखसे तोंड-भर, निर्मळ, प्रसन्न असे हास्य—श्रावणात लख्ख उन्ह पडावे तसे वाटायला लावणारे.

हे काही मजेशीरच. प्रत्येक वाक्य स्वतंत्र—एकाचा दुसऱ्याशी प्रत्यक्षतः संबंध नाही. वैचारिक सूत्रही सुतळीच्या सुटल्या गुंड्यासारखे वाक्या वाक्याला सैरावैरा धावणारे. एरवी ऐकाव्या लागणाऱ्या बऱ्यावाईट व्याख्यानांशी याचे सुतराम् नाते नाही. इतके उःस्फूर्त आणि दिशाहीन पण गतिमान काही पाहिले एकलेले नाही. ऐकताना अक्कल गुंग होते, बुद्धीला एक गुंगीही येऊ लागते, अंधुक कुठे तरी जाणवते, एव्हाना समुद्रावर सूर्यास्त झाला असेल. असाच क्षणोक्षणी अनपेक्षिताने झुलवणारा, बांधून ठेवणारा. अस्वस्थ, विचारमग्न करणारा – कसल्याही साच्यात, शब्दात, व्याख्यात आणि व्याकरणात कद होण्याचे साफ नाकारणारा. चैतन्याचा नैसर्गिक आविष्कार.

## नवा अनुभव

भाषण फार लवकर संपते. मध्येच एकदम संपते. घोंगावणारा वारा क्षणात पडावा आणि क्षणकाल सारे कसे अगदी निःस्तब्ध वाटावे तसे वाटते. त्या स्वैर, चपळ भाषणामागे, ते गेले असेल तिकडे धावत जावे असे वाटते. सारांश नाही, समारोपाचे ‘इतके बोलून मी’ किंवा ‘माझे हे काही नम्र विचार आपण इतका वेळ’ नाही, काही नाही. आहे आणि नाही यांतल्या अंतराएवढेच अंतर. बाबा आमटे खाली बस-तात. तुरळक गोंधळल्या टाळ्या पडतात. भाषण भलतेच लौकर संपल्याने की काय, अध्यक्ष प्रश्नोत्तरांची कल्पना मांडतात. श्रोत्यांत प्रथम स्तब्धता, चुळबूळ. प्रश्न कशा-वर? मुद्दे नाहीत तर शंका कशावर? शिस्तबद्ध सुसूत्र मांडणीची एखादी बरी-वाईट बैठक नाही तर आधार तरी कोणता घ्यायचा? छे:! बुद्धिवाद्यांना हा अनुभव बहुधा पहिलाच. मग चावत चावत उगीच थोडे प्रश्न विचारले जातात. त्यांना उत्तरे मिळतच नाहीत. उत्तरादाखल आणखी वेगळे काही उःत्स्फूर्त बोलले जाते. त्या बोलण्यातून आणखी वेगळे बोलणे निघू लागते. त्यातून आणखी वेगळे बोलणे. भाषण संपवूनही हा माणूस बोलत राहतो. उच्छ्वासासारखे याचे बोलणे याची प्राथमिक गरज वाटते. आतापर्यंत उभ्याने बोलला तो आता बसूनच बोलतो एवढाच फरक. बोलता बोलताच हसतो. मागेपुढे हिंदकळणाऱ्या बेचैन लाटांनी ठराविक अंतराने उचंबळून खडकावर येऊन पांढरे शुभ्र फेसाळसे फुटावे तसे याचे हसणे एका अनियमित नियमाने घडत असते.

अखेर अध्यक्ष संधी साधून एक समारोप घडवतात. वक्त्याच्या या असल्या अनिर्बंध शब्दाला बांधबंदिस्ती घालून पक्का निष्कर्ष श्रोत्यांहाती देण्याची अध्यक्षीय कोशिस करतात. प्रत्यक्षात त्याच्या काही ठळक शब्दांचा पुनरुच्चार तेवढा घडतो. वाहून गेलेल्या केवढ्या तरी गतिमानतेपर्यंत आता कोणीच पोचू शकत नाही. बहुधा तो स्वतःही पोचू शकणार नाही.

१६ मार्च १९६८

सभेचा उपचार संपतो, आणि तत्काळ त्याचा उत्स्फूर्त शब्दौघ पुन्हा खळखळत, हास्याने फेसाळत अनिर्बंध वाहू लागतो. सभागृहातून जाईपर्यंत यात खंड नसतो. अनेक श्रोते त्याला गाठतात. प्रौढ, विद्यार्थी, वृद्ध. कुणी ओळखी नव्या करून घेतात तर कुणी नव्याने ओळखी करून घेतात. कोण अनोळखी कोण ओळखीचे, ते पाहता–ऐकताना कळू शकत नाही इतके सगळे जणू त्याच्या खूप जुन्या ओळखीचे असतात. माणसे, कुठलीही आणि कोणतीही, याला नवी असूच शकत नाहीत असे वाटते. याला नवे भेटतात ते विचार आणि कल्पना. दर क्षणी या नव्या, अनपेक्षित, आनंददायक 'भेटी' घडत असाव्यात तशी याची काळी मुद्रा, बारीक नजर आणि शब्द आतून एकसारखा उजळून उठतो. या नित्य, नव्या अंतस्थ भेटीगाठीत हा माणूस सदाचा रंगलेला वाटतो. हा रंग क्षणोक्षणी भवताली आणि परिचित–अपरिचितांवर, रोगी–निरोगी देहमनांवर आपल्या धवल, मुक्त, निर्भर आणि कणखर हास्याने आणि तितक्याच मुक्त शब्दाने अत्तर गुलाबासारखा शिपडीत चालला आहे असे वाटते. या संजीवनीनेच महारोग्यांची मुर्दाड शरीरे याने चैतन्याची आगरे बनवली. वरोऱ्याला त्यांची एक नवी सुदृढ दुनिया उभी केली. सुदृढांच्या आजच्या महारोगी मनांना चैतन्य फुलवून त्या करवी सृजनाचे चमत्कार घडविण्याची याची आकांक्षा आहे.

## सुंदर सृष्टी

'सोमनाथ प्रकल्प' यापैकी. यानेच या कल्पनेला–योजनेला नव्हे–दिलेले नाव. अपॉर्च्युनिटीज, अनलिमिटेड. सोमनाथच्या जंगलात एक नगर वसविण्याची ही कल्पना. परंतु हे नगर वेगळे असणार आहे. या नगराच्या कच्च्या पक्क्या योजना याच्याकडे नाहीत. तज्ज्ञांच्या समित्या आणि बैठकाही याने मुळातच निकालात काढल्या आहेत. अहवाल शिफारशींच्या जाळ्यात या नगराचे भवितव्य अडकणार नाही. हे नगर माणसे उभारतील, यंत्रणा नव्हे. या नगराचे रूप माणसे ठरवतील, तज्ज्ञ नव्हे. या नगराचे प्रश्नही माणसे सोडवतील. जे जे त्यांच्या ठिकाणी अनुपयुक्त वा नकोसे आहेत त्यांना मजूर बिगारी म्हणून नव्हे तर माणसे म्हणून या नगराच्या कल्पनेचे जनक बाबा आमटे यांचे आमंत्रण आहे. आंधळे-पांगळे-रोगी-बकार ही तर या नगर उभारणीच्या कार्यातली बिनीची पथके. इथे येणाऱ्यापाशी किमान हवे एकच : श्रमण्याची इच्छा. कमाल काहीही. कारण या नव्या जगात अन्ननिवाऱ्यापासून सौंदर्य आणि संस्कृतीपर्यंत सर्व काही असणार आहे. हे केवळ उद्योग-नगर असणार नाही, हा केवळ आश्रमही होणार नाही, ही एक अगदी छोटी, स्वयंपूर्ण, खऱ्याखुऱ्या अर्थाने सुंदर अशी सर्वांगपरिपूर्ण सृष्टी असणार आहे, जिच्यात श्रमांना आणि माणुसकीला हक्काचा थारा राहील. छानदार रंगीबेरंगी लोलकांनी, पताकांनी आणि फुग्याबिग्यांनी सजवलेल्या शेतात बाळगाणी म्हणत पोरे श्रमांचे पाठ विद्येबरोबरीने शिकतील. इतिहास गणितांबरोबरीचे चित्र–काव्य–नृत्य–संगीत–नाट्य

यांचे प्रगल्भ संस्कार या चिमण्या जिवावर होत राहतील. इथे कोणी बेकार वा याचक असणार नाही.

हे केवळ स्वप्नच नव्हे. आज या स्वप्नाला वास्तवाचे रूप प्रतिकूल परिस्थितीशी झगडत लढत दिले जात आहे. घरे, रस्ते, सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य, अन्न, शिक्षण, उपजीविकेचे मार्ग हे प्रश्न प्रत्यक्ष सोडवले जात आहेत. उपलब्ध साधनांत आणि मनुष्यबळात ते सोडविण्यासाठी कल्पकता पणाला लावली जात आहे, संशोधन घडत आहे. आता बाबा आमटयांचे आवाहन विद्यार्थ्यांना आहे. सभेत ते म्हणाले, सोमनाथला या आणि जे घडत आहे ते स्वत: पाहून त्यात तुम्ही काय करू शकता ते तुम्हीच मला सांगा. या 'प्रकल्पा'तून जे जीवन आकारेल त्याची आर्थिक घडी, समाजकारण, राजकारण कोणते, कसे असेल ? आज तरी या माणसाला याची चिंता नाही. पाया घडत असता कळसाचे विचार मनात चमकून जात आहेत पण त्याविषयीचे निर्णय पाया घडविणारे योग्य वेळी एका अपरिहार्यपणे घेतील आणि ते दुष्ट वा अनिष्ट असणार नाहीत असा विश्वास बाबांना आहे. माणूस या शक्तीवर त्यांचा विश्वास आहे. हा विश्वास भाबडा नव्हे. आपल्या छोटया, हसऱ्या, चमकत्या डोळयांनी माणसे आणि माणसांपलीकडचेही बरेच काही सातत्याने, बारकाईने पाहात, हेरीत, शोधीत हा माणूस माणसांविषयी प्रेमाने आणि विश्वासाने तुडुंब भरलेला आहे. हा विश्वास साधा नव्हे. हा अवयव झडलेली वरोऱ्याच्या आनंदधामातली मनुष्यजातीने फेकलेली माणसे स्वयंपूर्ण आणि स्वाभिमानी बनवून त्यांच्याकरवी एक गतिमान सुंदर जीवन उभे करू शकतो.

ऐकताना, न्याहाळताना वाटले की 'समाज-कार्यकर्ता' नावाचा झापडे लावून काम करणारा कष्टाळू, रुक्ष प्राणी तो हा नव्हेच. हा तर स्वप्ने जगणारा प्रतिभा


# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

शाली कवी आहे. हिरव्यागार, घनदाट व्यक्तिमत्त्वाचा हा कवी जगातल्या ओसाडच्या धुंडीत आणि त्यावर सुंदर, स्वाभिमानी, नेक जिण्याच्या गहिन्या, उत्स्फूर्त कविता एकामागून एक फुलवीत चालला आहे. त्यात स्वतःला विसरला आहे.

बाहेर पडलो तेव्हा सहज समुद्राकडे ओझरते लक्ष गेले. असीम, अमर्याद समुद्र काळोख पिऊन काळाशार बनला होता. लांबवर लाटा फुटत फेसाळत होत्या. दूर क्षितिजाशी दिवे लुकलुकत होते.

कुसुमाग्रजांचे ते संबोधन अचानक समोर आले. महामानव.

सवयीनेच पावलांनी घराची वाट धरली. मन किती तरी वेळ समुद्रावर होते, समुद्रालगतच्या त्या सभागृहातल्या चैतन्यमय संध्यासमयात घोटाळत होते. ◻

## पारितोषिके आली स्पर्धा गेली !

सालाबादप्रमाणे नाटचस्पर्धापाठोपाठ महाराष्ट्र सरकारची मराठी चित्रपटांना पारितोषिके जाहीर झाली आणि चित्रपट-व्यवसायातला माझा एक मित्र उसासून म्हणाला, पारितोषिके आली पण स्पर्धा गेली ! म्हणजे स्पर्धा होण्याजोगे चित्रपट मराठीत निघत होते तेव्हा बेटी पारितोषिकेच नव्हती — अनेक चांगले चांगले मराठी चित्रपट लोकाश्रयाविना चक्क तोटचात गेले आणि राजाश्रयाचाही पत्ता नव्हता — आणि आता राजाश्रय आहे तर चांगली मराठी चित्रेच स्पर्धेसाठी सालीना दोनदेखील निघत नाहीत ! पहिल्या पारितोषिकाचा यंदाचा चित्रपट निकालाआधीच सांगता आला असता इतका तो आणि इतर स्पर्धक चित्रे यांत गुणांचे अंतर होते. बरे–माझ्या चित्रपट-व्यावसायिक मित्राचेच हे मत–परीक्षकांनी तरी काही धक्का देणारे अनपेक्षित आणि सुरसचमत्कारिक निर्णय देऊन एखादी वावटळ उठवायची ! अथपासून इतीपर्यंत मरगळलेल्या सध्याच्या मराठी चित्रपटांत



चंद्रकांत गोखले

नसलेले सनसनाटी नाट्य निदान परीक्षकांच्या निर्णयांनी तरी निर्माण व्हावे ? पण छे ! त्यांचीही संथ वाहते कृष्णामाई !

एकंदरीने या निर्णयांचे स्वागत महाराष्ट्र सरकारच्या अंदाजपत्रकासारखे थंडे झाले. नाही म्हणायला उत्कृष्ट चित्रपटकथेचे पारितोषिक एकाच्या नावे जाहीर झाले ते दुसऱ्याचे असल्याचा एक खुलासा सरकारतर्फेच नंतर झाला; दुय्यम भूमिकेचे म्हणून आपल्याला मिळालेले पारितोषिक आपण स्वीकारीत नाही कारण आपली भूमिका संबंधित चित्रपटात नायिकेची होती असा दावा एका अभिनेत्रीने केला–बस्स ! पारितोषिकांविषयी जाहीर प्रतिक्रिया म्हणावी अशी ही एवढीच.

पारितोषिकांविषयी कोणी काही म्हणो–अथवा न म्हणो–यंदाच्या पारितोषिकांतल्या एका पारितोषिकाने माझ्यासारख्या मराठी चित्रपटांच्या जुन्या (म्हणजे अलीकडचे मराठी चित्रपट पाहू न धजणाऱ्या ) प्रेक्षकाला फार संतोष झाला. हे पारितोषिक उत्कृष्ट नट म्हणून चंद्रकांत गोखले यांना देण्यात आलेले.

## अभिनयाची फार मोठी समज

पारितोषिकांच्या वृत्तात हे नाव पाहिले आणि एकदम ' मानिनी ' नावाचा एक आता जुन्यातच जमा होईल असा चित्रपट नजरेसमोर आला. या चित्रपटात गोखले स्वाभिमानी नायिकेच्या दरिद्री नवऱ्याच्या भूमिकेत होते. चित्रपटाच्या कथेचा आणि कॅमेऱ्याचाही कल नायिकेकडे होता. तिच्या मुद्रेवर उमटणारे आणि न उमटणारे बारीकसारीक भाव टिपण्यासाठी कॅमेऱ्याने शिकस्त केली होती. असायचा म्हणूनच पार्श्वभूमीचा एक तपशील म्हणून नवरा कुठे कुठे होता. चोरीचा आरोप त्याच्यावर श्रीमंत सासुरवाडीच्या एका समारंभात येतो आणि त्याच्या बायकोला या मानभंगाने होणारे दुःख शब्दांनी, अभिनयाने, कृत्रिम अश्रूंनी पडद्यावर ढळढळीतपणे दिसत असता मागे कुठे तरी तिच्या नवऱ्याच्या मूक भूमिकेत गोखल्यांनी त्या व्यथित प्राण्याचे जखमी काळीज केवळ मुद्राभिनयाने असे काही व्यक्त केले की नायिकेकडे माझ्यासारख्याचे लक्षही जाऊ शकले नाही ! पडद्यावर मध्यभागी, पुढे, सुस्पष्ट आणि सुंदर दिसणारा नायिकेचा चेहरा दुर्लक्षून चंद्रकांत गोखल्यांचा मागे कुठे तरी वावरणारा अनेकदा अस्पष्ट आणि कृश, सांशिक, मानी, विलक्षण बोलका चेहरा पाहण्यात मी रंगलो होतो. एकादाच शब्द ओठावर ओठ दाबून धरलेल्या कष्टाळू चेहऱ्यावरची एखादीच सूक्ष्म हालचाल, अशा मोजक्या तपशिलातून गोखले त्या काही दृश्यात शंभर शब्दबंबाळ मराठी चित्रपटातले तमाम संवाद बोलू शकणार नाहीत एवढे बोलले. यात अक्षराचीही अतिशयोक्ती नाही.

त्या दिवशी संशयातीतपणे खात्री पटली की, हा फार मोठा नट आहे. नाटकी अभिनय करणारा चित्रपट–नट नव्हे, तर चित्रपटाचाच असा सूक्ष्म, मोजका, हिशबी नि प्रभावी अभिनय करू शकणारा हा चित्रपटासाठीच जन्मास आलेला गुणी नट आहे.

गोखल्यांच्या त्याआधी नि त्यानंतर 'माझं घर, माझी माणसं', 'सुवासिनी' वगैरे चित्रपटांतून पाहिलेल्या मोजक्या भूमिका इतक्या 'ग्रेट' नव्हत्या. तरीही चित्रपटतंत्राची त्यांची अंगचीच उत्तम समज त्यातही जाणवे. ही समज गोखल्यांहून अधिक असलेले नट मराठीत दोन : एक, मास्टर छोटू आणि दुसरे, राजा परांजपे. या दोघांनंतर गोखलेच. नजरेत आणि कॅमेऱ्यात जरा अधिक भरणारी शरीरयष्टी या नटाला असती तर, याच्यापुढे कोणाची मातब्बरी चालणे कठीण होते. परंतु याहीपेक्षा हळहळ वाटावी ती गोखल्यांच्या कारकीर्दीत मराठी चित्रपटांच्याच ओढवलेल्या नष्टचर्याची. मी पाहिलेल्या गोखल्यांच्या अलीकडच्या भूमिका कुणा सोम्या गोम्यानेही कराव्यात, इतक्या टुकार होत्या.. कसब दाखवावे अशी एकही बेहतरीन जागा उभ्या अकरावाराशे फुटांच्या लांबीत कुठे चुकूनही आढळत नव्हती. ज्या भूमिकेबद्दल यंदाचे पारितोषिक गोखल्यांना मिळाले आहे, तो असलेला चित्रपट पाहणेदेखील धाडसाचे वाटते. गोखल्यांसाठी तो आता आम्ही पाहू ते सोडा.

## सरकारचे आभार

एकेकाळचा रंगभूमीवरचा हा गायक आणि नायक नट रंगभूमीवर आज दुय्यम तिय्यम गद्य भूमिका करतो आहे. श्री. ना. पेंडसे यांच्या 'राजेमास्तर'मधला राजेमास्तर ही गोखल्यांच्या वाटयाला आलेली रंगभूमीवरली शेवटची, महत्त्वाची भूमिका. गोखल्यांनी ती जीव ओतून केली. पण काय उपयोग ? शरीर पिळून केलेला अभिनय आजही लोकप्रिय असल्याने गोखल्यांच्या संयत, तद्रूप आणि पुष्कळच समंजस अभिनयाला रंगभूमीवर हवी तशी दाद लाभली नाही. काय क्रूर गंमत पाहा ! मराठी रंगभूमीवर गोखले उपेक्षित ठरले आणि गोखल्यांच्या अभिनयाला न्याय देणारे मराठी चित्रपटच निघेनासे झाले. नुसते संपन्न कलागुण आणि मनःपूर्वकता असून भागत नाही, नशीबही तेज असावे लागते, याचे साक्षात उदाहरण म्हणजे चंद्रकांत गोखले.

मराठी चित्रपटांचे काहीही खरे नव्हे; पण महाराष्ट्र सरकारच्या परीक्षकांनी मात्र (चुकून—माझा चि. व्या. मित्र.) फार योग्य गोष्ट केली, यात शंका नाही. या एका सत्कृत्याबद्दल त्यांना त्यांनी केलेल्या आणि न केलेल्या शंभर गफलती माफ आहेत. विशिष्ट कलामाध्यमासाठी घडलेल्या एका अव्वल कलावंताचा घवघवीत सन्मान, उशिरा का होईना, त्या कलामाध्यमात घडून आला, हे फार छान झाले.

O

# भूकंपाने जमीनच नव्हे तर जीवनच हादरले आहे

[illegible]

## उद्ध्वस्त संसार सावरण्यासाठी भूकंपग्रस्तांना सढळ हाताने मदत करा

आपली मदत खालील पत्यावर पाठवा :

**कोयना भूकंप पुनर्वसन निधी समिति**
इंडस्ट्रीयल अॅशुरन्स बिल्डिंग, पांचवा मजला,
चर्चगेट स्टेशनसमोर, मुंबई.

[illegible]



किनाऱ्यापाशी संथ हेलकावे घेत असलेला अथांग सागर... दूरवर पेंगुळल्यासारखा स्वस्थ पडून राहिलेला... अगदी दूर निळसर चांदण्यानं नुसता भारून निघालेला ... दक्षिण क्षितिजापाशी आकाशात विलीन होऊन गेलेलं चंदेरी, मुलायम जलविश्व...निश्चल तरंगणारी ढगांची लोकरी पिंजण. त्या पारदर्शी आवरणाखाली चमचमत असलेली तारकांची जरतारी नक्षी...समुद्रात प्रतिबिंबित झालेली... नाचऱ्याअधिऱ्या लाटा किनाऱ्यापाशी रेंगाळत हलके-हलके कुजबुजणाऱ्या, अन् आकाश तिथं अगदी ओठंगल्यासारखं. ती कुजबूज ऐकायला टपल्यासारखं ! ...

वाऱ्याच्या झोतांनी झोडपली गेलेली झाडंपेडं. त्यांनी आच्छादून गलेल्या पर्वतरांगा. शिखरं तेवढी रुक्ष, उघडी-वाघडी. वरच्या विशाल निळाईत घुसलेली. पण दक्षिणेकडून दाटत येणाऱ्या अंधारामुळं त्यांचा खडबडीतपणा तितका बोचक न वाटणारा. काळोख जणू त्यांना ऊबदार वाटतोय असा !

— — —
अनुवादक
— — —

# कुणा ससाण्याचे गाणे

सोव्हिएट साहित्याचे एक जनक
आणि
'दि मदर' या विख्यात कादंबरीचे लेखक
अॅलेक्सी पेशकॉव्ह ऊर्फ
मॅक्झिम् गॉर्की
यांची १६ मार्च १९६८
या दिवशी जन्मशताब्दी
साजरी होत आहे.
त्या निमित्ताने त्यांच्याच
एका कथेचा हा अनुवाद

ध्यानमग्न पर्वत. वातावरणात भिनू लागलेली अनामिक, निगूढ शांतता... पाण्यावर डोंगराळ सावल्यांचं गडद आच्छादन—सळसळत्या शेवाळी लाटांना दामटून धरून, दर्याचं उधाण जणू थोपवून धरू पाहणारं; पाण्याची अविरत चुळबूळ, फेसाचं उसळणं-विरणं अन् निगूढ नीरवतेला चरे पाडणारे असे सगळे सगळे ध्वनी काबूत ठेवू बघणारं. कारण सतेज—निळसर प्रभा आसमंतात फाकवीत झळकणारं चंद्रबिंब शिखराआडून अजून उगवलेलं नाही...असा हा संधिकाल...

"अल्ला हो अकबर!"
नादिर रागिम हळू उद्गारला.

शरद काळे

नादिर हा एक क्रिमिअन मेंढपाळ. वयोवृद्ध. केस पिकून गेलेले. अनुभवांनी मुरब्बीपण अंगी भिनलेलं. उंचनिंच अन् काटक बांधा. दक्षिणेकडल्या प्रखर उन्हाचे सतत चटके खाऊन पिंगट-लालट बनलेलं शरीर.

मी अन् नादिर एका खडकाजवळ पुळणीत पडलो होतो. शेवाळमाखला तो खडक गडद काळोखात अगदी बुडून गेला होता. मुख्य पर्वतभागापासून तुटून दूर येऊन पडला होता. म्हणूनच की काय खिन्न-विषण्ण वाटत होता. त्याच्या एका बाजूला सागरवेलींची, पाणरोपट्यांची झालर वाढली होती. त्यामुळं समुद्र व डोंगराळ भाग यांच्या मध्ये असलेल्या पुळणीच्या निरुंद पट्ट्याला तो खडक बांधून टाकल्यासारखा वाटत होता. किनाऱ्याच्या भूभागावर खोल चऱ्यांचं जाळं पसरलं होतं, अन् आमच्या कँप्फायरच्या उजेडामुळं ती बाजू उजळून निघाली होती. ज्वाळा जसजशा झळकून उठत, तसतशा त्या पुरातन पृष्ठभागावर सावल्या नाचत असताना दिसत.

नुकती पकडलेली ताजी मासळी आम्ही शिजवीत होतो. त्या विश्रब्ध वातावरणात वृत्ती हळवी बनली होती. प्रत्येक गोष्ट नितळ, प्रेरक अन् सुबोध भासत होती. मनं हलकी-फुलकी अन् अव्याज बनली होती. वाटत होतं, इथंच स्वप्नाळूपणानं पडून राहावं. दुसरं काही काही करू नये...

किनाऱ्यापाशी दर्या झुलत होता. लाटांचा आवाज इतका मंद व हळुवार येत होता की आम्ही पेटविलेल्या जाळावर त्यांना शेकून घ्यायचंय, असं वाटत होतं. एखादी चिटुकली लाट मध्येच आमच्या पायांजवळ घोटाळून जाई. तिच्या त्या मानानं थोड्या वरच्या पट्टीतल्या आवाजामुळं फेसाच्या सळसळाटात खंड पडे.

मग रागिम समुद्राकडे तोंड करून पडून राहिला. कोपरं वाळूत रुतवून अन् चेहरा तळव्यात घेऊन गंभीर मुद्रेनं त्यानं दूरवर नजर लावली. त्या ठिकाणी सावल्यांचं सावट दाटलं होतं. त्याची लोकरीची हॅट डोक्यामागे सरकली होती. खारं वारं त्याच्या कपाळावरल्या नीटस सुरकुत्यांना थरकवीत असल्यासारखं वाटत होतं.

तो मग तंद्री लागल्यासारखा, एखाद्या तत्त्ववेत्याप्रमाणं बोलू लागला. मी ते ऐकतोय् की नाही, इकडे त्याचं लक्ष नव्हतं. ते बोलणं जसं काही दर्याला उद्देशून होतं—

" अल्लाची जो प्रामाणिकपणानं सेवा करतो त्याला स्वर्ग मिळतो म्हणे ! पण खुदा काय अगर त्याचा प्रेषित काय—या दोघांनाही जो भजत नाही तो ? कदाचित तो इथंही असेल. या विरघळत्या फेसात मिसळत असेल अन् हे रुपेरी ठिपके दिसतात ना पाण्यावर ? ते त्याचेच अंश असू शकतील. कुणी सांगावं ? "

उचंबळून आलेला गडद दर्या एकदम अधिक झगमगीत बनला अन् चांदण्याचे इवले शिंपुले पाण्यावर इतस्ततः विखुरले. खडबडीत शिखरांआडून चंद्र वर सरकला अन् गुंगून गेल्यासारखं त्याचं तेज किनाऱ्यावर, आमच्यापासच्या खडकावर, समुद्रावर सर्वत्र बरसू लागलं, हलके निःश्वास सोडून समुद्र त्याला आलिंगन देण्यासाठी वर उसळत राहिला.

मी म्हणालो, " रागिमबाबा, एखादी कहाणी तरी सुनाव ! "

" आँ ? कशासाठी रे ? " मान न वळविता त्यानं विचारलं.

" कशासाठी म्हणजे ? तू सांगतोस ते किस्से ऐकण्यात मोठी मजा येते बघ ! "

" अरे यार, कथाकहाण्या तर सगळ्या तुला सांगून टाकल्या. आता आणखी कुठली सांगायची ? "

असा तसा तो बधला नसता. अजून आर्जव करायला हवं होतं. म्हणून मी त्याची खूप मनवरणी केली. तेव्हा कुठं त्यानं रुकार दिला—" बरं ! तुझा आग्रहच आहे; तेव्हा एखादं गीत म्हणून दाखवतो हवं तर ! "

खास जुन्या साठ्यातलं त्याचं गाणं ऐकायला मिळणार म्हणून मी हरखून गेलो.

प्राचीन संगीताची लय साधीत, संथ सुरात तो गाऊ लागला—

उंच उंच पर्वतकड्यांवरून दर्याच्या दिशेनं सरपटत, वळसे घेत एक सर्प खाली आला. धुकं भरल्या दरीत विसावण्यासाठी.

## जीवन–तत्त्वज्ञान

Majestic and free, his proud head raised high, he marches slowly, yet with firm step, over the dust of old prejudices, alone in a grey mist of errors, the cloud of the past rising behind him and a host of perplexities ahead.

" They are numberless as the stars in the unfathomable heavens, and there is no end to man's journey ! "

" Thus restless man marches on—onwards and upwards ! ever onwards and upwards ! "

**–Maxim Gorky**

" माणूस मार्ग आक्रमीत असतो— ताठ मानेनं, मोठ्या दिमाखानं, अन् स्वच्छंदपणे. धीमे धीमे पण दृढ असं एकेक पाऊल रोवीत तो पुढे सरत असतो. जुनाट पूर्वग्रहांची धूळ तुडवीत, प्रमादांच्या करडट, धूसर पटलांमधून तो एकटाच चालत राहतो. त्याच्या पिछाडीला भूतकाळाची अभ्रं जमत जातात अन् त्याच्यासमोर दूरवर अनाकलनीय गुंतागुंतीचा जथा ठाकलेला असतो.

" गोंधळवून टाकणाऱ्या, भ्रमिष्ट करणाऱ्या या समस्या अगणित असतात— मर्यादातीत ( असीम ) आकाशात नक्षत्रांचा खच असावा तशा ! तर माणसाच्या मुशाफिरीला सीमा नसते !

" या सतत धडपडणाऱ्या, अस्वस्थचित्त पांथस्थाची आगेकूच अशी सुरूच असते— सदैव वर, आणखी वर ! उन्नतीप्रत, उदात्ताप्रत ! "

सूर्य वरती धगधगत होता. पर्वतांचे उष्ण निःश्वास वर हेलावत होते. खूप खाली लाटा घुमघुमत होत्या. खडकावर आदळून फुटत होत्या.

अंधार न् धुकं यांनी माखलेल्या त्या दरीतून एक नदी फोफावत चालली होती. दर्याच्या रोखानं वाहणारं तिचं वेगवान पात्र वाटेतले दगडगोटे उलथून टाकीत होतं.

फेसाच्या राशी उसळवीत, फवारे उडवीत तो जोमदार, शुभ्र जलौघ कपारी-पासून अलग होत होता अन् बेगुमानपणे दर्यात कोसळत होता.

अन् अकस्मात, रक्तमाखल्या पंखांची फडफड करीत, जखमी काळजातल्या वेदना सोशीत एक बहिरीससाणा अस्मानातून त्या खोल दरीत येऊन पडला— गोळ्यासारखा ! तो सर्प तिथंच वेटोळे घालून बसला होता.

जमिनीवर आदळताच ससाण्यानं एक चीत्कार फोडला अन् तो आपले पंख खडकावर थडथड आपटू लागला — अगदी असहाय बनून.

सर्प दचकून एकदम दूर सरकला.

पण लवकरच त्याला कळून चुकलं—या पक्ष्याचा अंतकाळ अगदी जवळ आलाय. काही क्षणांचाच तो सोबती आहे !

म्हणून सर्प तसाच वळवळत जखमी ससाण्याजवळ आला अन् त्याच्या कानात फुत्कारत छद्मीपणानं त्याला म्हणाला,

" किती अवेळी मरण ओढवलं तुझ्यावर ?"

" असं झटपट मरणं भाग आहे मला !" ससाणा उसासत म्हणाला, " पण काही हरकत नाही. मी जगून गेलोय. सुखाचा आस्वाद घेऊन चुकलोय. एका आगळ्या संग्रामात जीवानिशी झुंजलोय. अस्मानात मी उंच उंच झेपावून घेतलंय, घुसून घेतलंय ! ... नाहीतर तू ! करंटा, करंटा निव्वळ ! आकाश ही काय चीज आहे ते मीच जाणतो. तुझ्या वे नशिबी नाही — कदापि नाही !"

" आकाश ? त्यात काय आहे एवढं ? मला नाही त्याचं एवढं अप्रूप वाटत. आकाशात कधी सरपटता येईल का ? त्यापेक्षा ही दरीच बरी ! किती ऊबदार अन् बंदिस्त !"

खरं तर असं म्हणताना त्या स्वैर-स्वच्छंद पक्ष्याच्या बोलण्याची सर्प मनोमन थट्टा करीत होता. त्याला वाटत होतं — " एखादा प्राणी उड्डाण करतो, तर एखादा सरपटतो. पण काही झाले तरी शेवटी काय ? सगळे मातीलाच मिळायचे !"

इतक्यात ससाण्यानं डोकं वर उचललं अन् आपल्या झुकत्या नजरेच्या एकाच टप्प्यानं त्या गर्द दरीचा वेध घेत तो घसटू लागला.

खडकांतील तड्यांमधून पाणी झिरपत होतं. दरीतल्या वातावरणात मृत्यू अन् विनाश सूचित करणारा कुबट वास कोंडून राहिला होता.

सगळं अवसान गोळा करून ससाणा ओरडला, " एकदा — फक्त एकदाच मला आकाशात सूर मारता आला असता तर —? काय बहार झाली असती ! शत्रूला

पकडून, छातीवर दाबून धरून त्याला असा चिरडून टाकला असता; माझ्या गरम रक्ताच्या लोंढ्यात इतका गुदमरून सोडला असता की...छे: ! शत्रूशी झगडण्यात एक आगळाच आनंद असतो, बेहोषी असते !"

हे ऐकून सर्पाला वाटू लागलं; अस्मानातलं वास्तव्य खरंच आनंददायी असावं. त्याशिवाय या पक्ष्यानं असं आक्रंदन केलं नसतं !

सर्प मग त्या स्वातंत्र्यप्रिय ससाण्याला म्हणाला, "तू असं कर. असाच त्या सुळक्याच्या अगदी कडेपर्यंत घसटत घसटत जा अन् तिथून झोकून दे आपलं शरीर अस्मानात. कुणी सांगावं ? तुझ्या पंखात अजूनही ताकद असेल तुला पेलण्याची, अन् कदाचित तू उंच सूर मारू शकशील..."

ससाण्याच्या अंगातून एक शिरशिरी निघाली. मोठ्या अभिमानानं त्यानं चीत्कार केला अन् चिखलवटीतून आधार शोधीत, कड्याच्या टोकाच्या दिशेनं रखडत—रखडत तो जाऊ लागला.

शिखर गाठल्यावर त्यानं एक दीर्घ श्वास घेतला. पंख रुंद पसरले अन् चमकदार डोळ्यांनी वेध घेत अवकाशात झोकून दिलं.

हवेत उंच फेकलेल्या एखाद्या गोट्यासारखा हां हां' म्हणत तो खाली आला. त्याचे पंख पिजून गेले. पिसांची इतस्ततः पखरण झाली.

एका लाटेनं त्याला झेललं, रक्ताळलेलं त्याचं शरीर धुऊन टाकलं, फेसात अलगद गुंडाळलं अन् ती त्याला समुद्रतळाशी खोलवर घेऊन गेली !

उसळत्या लाटा त्या कड्यावर आक्रंदत फुटत होत्या. ते आक्रंदन शोकपूर्ण वाटत होतं आणि ससाणा कुठल्या कुठे जाऊन पडला होता. सागराच्या अथांगतेत लोपून गेला होता !

सर्प खूप वेळ त्या दरीत वेटोळं घालून बसला होता. ससाण्याचा मृत्यू अन् त्याची अस्मानाची ओढ यांबद्दलचे विचार राहून राहून त्याच्या मनात घोळत होते.

त्यानं अवकाशाकडे नजर लावली — अस्वस्थ आत्म्यांना सुखद वाटणारी स्वप्नं अनंत अवकाशातच उत्पन्न होतात !

..."या रितेपणात, अनंत पोकळीत त्या अभागी ससाण्याला एवढं काय दिसत होतं ? केवळ आपली उत्तुंग उड्डाणाची भूक भागविण्यासाठी हे पक्षी असे इतरांचे बळी का घेतात ? या आकाशात अशी कोणती अपूर्वाई व्यापून राहिलीय ? इतक्या अल्पावधीत हे सगळं कळून येत असेल, तर मलादेखील, फक्त एकदा उड्डाण ठोकताच, त्याची सहज उमज पडू शकेल..."

असं पुटपुटत सर्पानं आणखी वळसे घातले अन् वेटोळं अगदी घट्ट करून घेऊन आकाशाच्या दिशेनं झेप घेतली. त्याच्या तकतकत्या अंगाची गडद नागमोडी रेषा उन्हात झळकली.

पण सरपटण्यासाठीच जे जन्माला येतात, त्यांना उड्डाणाचं इंगित कधीही

कळायचं नाही !

सर्प खडकावर आपटला. विशेष म्हणजे त्यामुळं त्याच्यावर मरणाची पाळी आली नाही ! तुच्छतेनं हसून तो उद्गारला.

"हुं ! हाच का उड्डाणातला आनंद ? अन् पतनातलं सुख ते हेच का ? छे ! पक्षी किती मूर्ख असतात म्हणायचे ! जमीन ही काय चीज आहे, हे त्यांना कळत नाही. म्हणून ते दुःखी होतात अन् अवकाशात आरोहण करतात. तिथल्या थरथरत्या विशालतेत राहतात. पण तरी काय झालं ? अवकाश म्हणजे एक शून्य पोकळी, फक्त प्रकाशाचं साम्राज्य. पण देह तग धरू शकेल, पोसला जाईल, असं तिथं काय आहे ? मग पक्ष्यांची ही घमेंड कशासाठी ? घृणा कशासाठी ? आपल्या वेड्या महत्त्वाकांक्षा अन् जीवनसंघर्षातलं अपयश जगापासून लपविण्यासाठी ? धिक्कार असो या पक्ष्यांचा ! ...पक्ष्यांनो, यापुढे मात्र तुमचे शब्द मला चकवू शकणार नाहीत. आता मी पुरा उमजून चुकलोय, आकाश बघून घेतलंय, उंचउंच जाऊन ते सगळं अस्मानी विश्व पालथं घालून आलोय मी ! पण आत्ता जो खाली आदळलोय तो मरण्यासाठी मात्र नव्हे ! उलट, माझ्या श्रद्धा त्यामुळं अधिक दृढ बनल्यात. मातीवर, धरतीवर ज्यांचा विश्वास नाही, ते राहू देत भ्रामक कल्पनांच्या वात्रट्या उडवीत ! सत्य काय आहे, हे मला पुरतं समजलंय. पुनश्च कधीही पक्ष्यांचं आव्हान आपण मनावर घेणार नाही. मी मातीत जन्म पावलो आहे अन् मातीचा, केवळ मातीचाच आहे !"

असं म्हणताना सर्प अभिमानानं फुलून निघाला. एका दगडावर वेटोळं करून बसला.

समुद्र झगमगत होता, डोळे दिपवून टाकणारी चमक फेकीत होता. किनाऱ्यावर लाटा हिंस्रपणे धडकत होत्या, त्याच्या सिंहगर्जनेतून त्या ससाण्याचं गाणं निनादून उठत होत.—

" साहसाच्या बेहोषीनं धुंद बनून आम्ही गातोय ! ...

' साहसाची धुंदी हेच जीवनाच सार आहे, त्यातच शहाणपण आहे ! ...

' हे बेदरकार ससाण्या, आपलं अमोल रक्त तू सांडलं आहेस–शत्रूशी झगडताना.

' पण एक काळ असा येईल, की ज्या वेळी या जिण्याच्या काळ्याकुट्ट अंधारात तुझ्या रक्ताचा थेंब न् थेंब ठिणगीसारखा रसरसून उठेल अन् स्वातंत्र्यप्रेमानं, प्रकाशाच्या आकर्षणानं शूर मनं पेटून निघतील...!

' जीवनाचं मोल तू पुरेपूर मोजलं आहेस. पण शूर वीरांच्या गीतांतून तू अमर होशील. प्रकाशमान स्वातंत्र्यासाठी जो लढा द्यावा लागतो, त्याचं अस्मितेला फुलविणारं, अभिमान डिवचणारं आव्हान तू देत राहशील...! साहसाच्या बेहोषीनं बेबंद बनून आम्ही हे गीत गातोय !"

दर्याच्या धडकांनी खडक थरथरत होते. त्या गीतध्वनींनी गगन कंपायमान होत होतं !

समुद्राची घसबस अगदी मंदावली आहे. किनाऱ्यापाशी रुळणाऱ्या लाटा मंजुळ-वाण्या गात आहेत. मी दूरवर टक लावून राहिलोय. शांत शांत वाटतंय. पाण्यावर इथेतिथे खूप रुपेरी बत्तासे सांडले आहेत !...आमच्या किटलीतून हळुवार, घुमघुमता आवाज निघत आहे...

मध्येच एक लाट आपल्या मैत्रिणींना मागे टाकून पुढेपुढे येते. अन् रागिमच्या मस्तकाला स्पर्श करते. सळसळून त्याला वाकुल्या दाखवते. रागिम ओरडतो,

"ए, कुठं निघालीस ! चल फीर मागं !"

तशी ती लाट समजूतदारपणानं परतते. रागिम तिला माणसासारखं मानतो, याचं मला मुळीच आश्चर्य वा अप्रूप वाटत नाही. आमच्याभोवतीची हरएक बाब या वेळी अतीव चैतन्यपूर्ण, कमालीची तरल अन् शीणभाग विसरायला लावील अशी...समुद्र अगदी शांत अन् थंडावलेला, दिवसाच्या उष्णतेनं पर्वतशिखरं तेवढी अजूनही धगधगत असलेली. पण त्यांच्या दिशेनं वाहणारं खारं वारं आपल्या शीतल शक्तीची प्रचीती दाखविणारं. आकाशाच्या निळ्याशार पार्श्वभूमीवर तारकांनी सुवर्णाक्षरांत कोरून काढलेला गूढगंभीर संदेश—आत्म्याला भुरळ घालील अन् साक्षात्कारी जाणिवेनं मन बेचैन करून सोडील असा दिव्य संदेश !...

या क्षणी प्रत्येक गोष्ट पार गुंगून गेलेली. पण तशी अगदी सजग—सावधदेखील. आसमंतावर पेंग पसरलेली. पण ती केव्हा उडेल, सांगता येणार नाही. कोणत्याही क्षणी सर्व वस्तू थरकून उठतील अन् आवाज उंचावून, अत्यंत मंजुमधुर स्वरमेळ साधून समूहगान घुमवू लागतील. जीवनातली सगळी निगूढता अन् रहस्यमयता त्या गीतस्वरांतून व्यक्त होईल, मनाला स्पष्टपणे प्रतीत होईल अन् शांतवून टाकील. एखादी भ्रामक ज्वाला लपकन मालवावी तशी ! ते सुमेळ संगीत आत्म्याला अलगद उचलील अन् रात्रीच्या गर्द निळाईत तरंगत ठेवील. चांदण्यांची चमचमणारी, जरतारी नक्षी तिथं तेच एकमेव दैवी प्रचीतीनं भारलेलं संगीत गात असेल......! ○

ज्या ज्या वेळी माझ्या लेखन प्रेरणेविषयी पृच्छा केली जाते, त्या त्या वेळी मी उत्तरतो :—

—"एकतर भयाण–विषण्ण जीवनाचं दडपण असह्य झाल्यामुळे मी लिहू लागलो. दुसरं असं की काही गोष्टी मनात खोलवर ठसल्या होत्या—इतक्या ठळकपणे की त्यांना शब्दरूप दिल्यावाचून माझ्यानं राहवेना." — गॉर्की

आता खरच माझी मान उंचावली आहे. तू तुझे तोंड अखेरपर्यंत नाही दाखवलेस, पण तू आता कलंकित नाहीस, हुतात्मा आहेस.

तुम्हाला हवा आहे मियाबीबीचा संसार. माझी अडचण होते आहे ना – ठीक आहे. जातो मी – पण परत येईन तो मानचिन्ह घेऊनच.

'हे पाप माझ्या डोळ्यासमोर नाचवू नकोस' फ्रॉक कधी पाप असतो का, रे बाळ ! मला अजून तो मिळाला नाही.........................

# माझा बाळ पावन झाला !

आई

आज या पणतीच्या ज्योतीत माझ्या बाळाची प्राणज्योत सामावली आहे. त्याला अग्नीने जवळ केले आहे. मीसुद्धा त्याला इतका जवळ करू शकले नाही. त्याला कोणीच जवळ केले नाही. मी त्याला जवळ करण्याचा प्रयत्न केला पण तो माझ्यापासून दूरच राहत आला. आणि आता कायमचा. पाप प्रेमालासुद्धा भिते का ? मग माझ्या रक्तमांसाचा बनलेला माझा बाळ का माझ्यापासून दूर राहायचा ? तनाने व मनाने. माझा जीव त्याच्यासाठी तुटायचा. त्याच्या मृत्यूनंतरही तुटतो आहे. बाकी कोणाला काही वाटत नाही. सर्वांना वाटते आपल्या डोक्यावरचा भार कमी झाला. भुईचे ओझे नाहीसे झाले. पण नाही. तसे नाही. माझा बाळ पावन झाला आहे. आपल्या मातेसाठी नाही, तरी मातृभूमीसाठी त्याने देह खर्ची घातला आहे. ९ महिने आईच्या पोटात राहून तिच्याच रक्तावर तो पोसला परंतु तिच्या दुधाला मात्र तो जागला नाही. परंतु ज्या मातीतले अन्न त्याने खाल्ले आहे त्या मातीसाठीच त्याने आपल्या देहाचे सोने केले.

तुझ्या दैवाचा फासा कधी व कसा उलटा पडला ते कोणालाच कळले नाही.



निदान मला तरी. मला आठवत आहेत तुझे बोबडे, चिमखडे बोल आणि भुरुभुरु उडणारे जावळ. चाळीतल्या सर्वांनाच तू वेड लावले होतेस. अगदी रांगता असल्यापासून तू घरात नसायचास. तुझ्या भुकेची वेळ झाली की मला सबंध चाळ शोधून तुला लपलेल्या जागेवरून शोधून आणावा लागे. पुढे मोठेपणी तू असाच माझ्यापासून लपत राहशील ही काय कल्पना. अगदी सर्वांना भुलवणारा होतास. कोणीही शेजारणी पाजारणी येत व तुला उचलून नेत. पण आता कोणी तुझ्या भुलथापांना बळी पडेनाशा झाल्या होत्या. तुझ्याकडे पाहून त्यांच्या कपाळावर अठी पडत होती. हे सर्व पाहून माझ्या पोटात तुटत होते. माझी वेडी माया अगदी दुबळी होती रे !

सहा वर्षाचा असताना तुला शाळेत घातला, इतर मुलांचा शाळेतला पहिला दिवस कोण आकांताचा, पण तू अगदी आनंदाने बाबांबरोबर गेलास आणि शाळेत गेल्यावर सरळ बाबांना सांगितलेस 'बाबा तुम्ही जा घरी. मी येईन शेजारच्या वसंताबरोबर घरी', तेव्हा तुझ्या बाईंनासुद्धा किती आश्चर्य वाटत होते. त्यांनी ह्यांच्याजवळ बोलूनही दाखविले. "खरच तुमच्या मोहनला किती शाळेची गोडी आहे. नक्की तो शाळेचे नाव काढील. अहो मुलाचे पाय पाळण्यात दिसतात." किती निराळ्या अर्थाने त्यांचे ते बोल आज खरे ठरले ! सर्वजण तुझ्याकडे बोट दाखवून म्हणायचे, यानेच मास्तरांना माराची धमकी देऊन मार्कबुक बदलवून घेतले

– – – – – –

**सौ. अलका बापट**

– – – – – –

होते. या शाळेत अद्याप असा प्रकार कधी झाला नव्हता. थोरामोठ्यांची मुलेच अशी जर वागायला लागली तर आमची मुले बिघडायची हो याच्या संगतीत. अहो दारूच्या गुत्यात बसून चहा प्यायला तरी लोक त्याला मद्यपीच म्हणणार !! एक ना दोन. अण्णा तुझ्यापेक्षा मोठा. तो खूप समंजस होता. पण तुम्ही दोघे एकाच शाळेत असल्यामुळे त्याला किती बरे उपेक्षा सहन करावी लागत होती. त्याच्या बुद्धीचे, गुणांचे त्या शाळेत कधीच चीज झाले नाही. शेजारचा शरद किती तुझ्यासाठी जीव टाकायचा. कालसुद्धा तार वाचून तो ढसढसा रडला. पण त्याचे प्रेमाश्रू तुला कधीच दिसले नाहीत. तू त्याची नेहमी बावळट, हळवा म्हणून टिंगल करायचास. तू नीट वागावस म्हणून तुझ्या तो विनवण्या करायचा तर तू त्याला धडकावून लावायचास. तुझ्याशी मैत्री केल्याबद्दल त्याने वडिलांचा बेदम मारही खाल्लेला आहे. तेव्हा त्याच्या पाठीला तेलहळद मीच लावली होती. परंतु माझ्या मनाच्या जखमेवर तुझ्या वर्तणुकीची हळद झोंबत होती. ती जखम भरली गेली, ज्या दिवशी तू मला नमस्कार करून गेलास तेव्हा. तेव्हा मला वाटले हा प्रेमापुढे व सज्जनांपुढे वाकला नाही परंतु आता याला लष्करी शिस्तीपुढे वाकावेच लागेल. तेव्हा मला तू म्हणालास "आई आता परत तुला हे कलंकित तोंड दाखविणार नाही. जर आलो तर मानचिन्ह घेऊनच.". मला तेव्हा तुझे बोल काही विशेष वाटले नाहीत, कारण माझ्या अश्रूंच्या प्रश्नांना तू कायम हेच उत्तर देत आला आहेस की, आई मी आता सुधरीन, तुला प्रतिष्ठा प्राप्त करून देईन. आणि माझे आईचे वेडे मन तेच स्वप्न पाहात बसे. त्यांना गोंजारीत बसे. कोणी तुझ्याबद्दल अपशब्द काढला तर तीच स्वप्ने त्यांना विश्वासाने उत्तर देत. पण अखेर ती सगळी स्वप्ने निरुत्तरच झाली. पण आता ! आता खरच माझी मान उंचावली आहे. तू तुझे तोंड अखेर-पर्यंत नाहीच दाखविलेस. बॉम्बगोळ्यांनी तुझा देह छिन्न-विछिन्न झाला. त्याचे काही अवशेष मिळाले परंतु चेहरा नाही मिळाला. परंतु तू आता कलंकित नाहीस. तू आता हुतात्मा आहेस. आता दृश्य स्वरूपात नाही तरी निदान माझ्या स्वप्नात तरी ये, माझ्या बाळाला मी आरती ओवाळीन. कारण आता तू पावन झाला आहेस. येशील ना ?

स्वादिष्ट मिठाईसाठी आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

झाले ! एका जीवाच्या नाटकावर पडदा पडला. आता फक्त राहील त्याचे नाव हुतात्म्यांच्या यादीत. हं ! आता मला म्हणावे लागेल मला एक भाऊ होता. खरंच बाळ मला अखेरपर्यंत कधीच समजू शकला नाही. मी त्याचा मोठा भाऊ. वडील म्हातारे असल्याने आपोआपच जबाबदारी माझ्यावर. परंतु मी ती जबाबदारी पेलू शकलो नाही. त्या जबाबदारीतून अंग काढून घेण्यासाठी मी बाळाला लष्करात घातला असेच सर्वजण म्हणतात. म्हणू देत. मला आता एक तरी समाधान मिळेल की बाळने जीवनात निदान एवढे तरी पुण्यकर्म केले की, मातृभूमीच्या रक्षणासाठी तो मेला. त्याला लष्करात भरती करीपर्यंत माझ्या मते मी माझे कर्तव्य बजावीत आलो होतो पण त्याला दैवाची साथ नव्हती. टाकलेले दान उलटेच पडत होते. मी त्याच्यापेक्षा ७–८ वर्षांनी मोठा. पण तो मला कधीच मिऊन राहिला नाही. मी त्याला काही समजवावयाला जावे तर तो माझे बोलणे अगदी अंगाबाहेर टाकायचा. कधी कधी माझ्या मित्रांदेखत माझी उपेक्षा करायचा. त्याच्या मते मी अगदीच 'हा' होतो. कारण मी घरात व अभ्यासात लक्ष देत असे व याचे लक्ष त्या व्यतिरिक्त असे. माझे लक्ष जास्तीतजास्त अभ्यास करून नंबर राखण्याकडे तर याचे लक्ष हजार

काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

डोंगरे

अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

के. टी. डोंगरे अॅण्ड कं., प्रा. लि.,

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

डोंगरे बालामृताचे

लटपटी करून ३५ टक्के मार्क मिळविण्याकड. अहो चांगल्याची अपेक्षा केली तर चांगले मिळेल. पण बाळचे सर्वच निराळे. त्याच्या पायी मला शाळेत मान खाली घालावी लागे. तो तसा बुद्धीला बरा होता.पण त्या बुद्धीचा वापर करणे त्याला आवडत नसे. त्याचा आपल्या कर्तृत्वशक्तीवर (?) विश्वास होता. बरे कशाही तऱ्हेने का होईना एकदाचा मॅट्रिक पास झाला. नंतर तरी सुधारेल, पण छे ! अहो मूळ स्वभाव जाईल का ? मी आता इंजिनिअर झालो. चारचौघांत प्रतिष्ठा मिळवून राहिलो. पण बाळ, त्याने समाजाकडून उपेक्षाच स्वीकारली. कारण तो सर्वांची उपेक्षा करायचा. अगदी आईच्या आणि अक्काच्या प्रेमाचीसुद्धा. मी तर त्याला वैरीच वाटायचो. कारण त्याच्या हितासाठी मी झटत होतो ना. आपल्याच पाठचा भाऊ आणि त्याची अशी अवस्था कोणाला तरी बघवेल का ? माझ्या मनातील हौशी मारून मी याला कपडे वगैरे सर्व काही करत असे. का तर याचे मन एवढयाशा कारणावरूनही बिथरू नये. पण ते त्याला कधीच दिसले नाही. एक दिवस रस्त्यात त्याच्या हातात मला सिगारेट दिसली. तेव्हा तो फक्त ८वीत होता. माझ्या मनातील कोपरा चमकला. परंतु तेव्हा मी बोलू शकलो नाही. कारण आई-बाबा दोघेही नागपूरला होते. तुला शासन करण्याची माझ्या मनात तीव्र इच्छा झाली. पण तू चारचौघांत बोभाटा करायला कमी केले नसतेस. आईलासुद्धा खरे कारण कळले नसते आणि दोष माझ्याच माथी आला असता. कारण आईला घडलेली गोष्ट सांगायचा मला धीर झाला नसता. तिच्या वेदना मी पाहू शकलो नसतो. पण त्यामुळेच तुझे मातेरे झाले. आणि पुढे संगतीने तू अधिकच बिघडत गेलास. त्यापासून सुटका केली ती मृत्यूनेच. मॅट्रिक झाल्यावर मी तुला इलेक्ट्रिशिअनचा कोर्स द्यावयाचा ठरवले. मित्राच्या खटपटीने ॲडमिशनही मिळाली. परंतु चार दिवसांतच तू रामराम ठोकून मला व माझ्या मित्राला तोंडघशी पाडलेस. अनेक ठिकाणी माझ्या सर्व प्रयत्नांवर तू नांगर फिरवलास. याला कारण तुझी स्वच्छंदी वृत्तीची ओढ. तुला ऑफिसचे वातावरण कोंदट वाटायचे. आणि सिनेमा थिएटरजवळील पानपट्टीचे दुकान हेच विश्व वाटायचे त्या वेळेस मला तू हरिश्चंद्राची सत्त्वपरीक्षा घेणारा विश्वामित्र वाटायचास. अखेर मीही माझी प्रतिष्ठा गमावून बसलो, तुझ्यापायी. या तुझ्या काळजीने खचूनच बाबा गेले. त्यामुळे आईची माया अधिकच वेडावली. तिला वाटायचे मीच तुला हिडिस-फिडिस करतो आहे. आणि तिच्या अश्रूंनी माझा सारा राग पुसला जायचा. पाटी परत कोरी होई व पुन्हा तुझ्या भावी आयुष्याची वेडीवाकडी भेसूर चित्र-रेषा ठळकपणे उमटू लागत, पुढे माझे लग्न झाले. मी माझ्या घरातील व्यथा समजू शकत होतो. परंतु जिचा दैवयोगाने जोडलेला संबंध, ज्यात रक्ताचा जिव्हाळा नाही त्या तुझ्या वहिनीला त्याचे काय सोयरसुतक असणार. मी तिलाही समजू शकत नव्हतो आणि तुलाही. तुम्ही दोघे माझी बोलणी खात असा व मी तुम्हा दोघांची. या कलहातून एक बाहेर पडल्याशिवाय हे मिटणार नव्हते. तुझ्यावर घर टाकून मला बाहेर

पडणे कदापि शक्य नव्हते आणि तुला घरातून बाहेर काढणे सोपे नव्हते. या कात्री-मधून बाहेर पडण्यासाठी मी तुला लष्करात घालण्याचा प्रयत्न केला. तेव्हासुद्धा तुला वाटले की हा अण्णाचा स्वार्थ आहे. तेव्हाचे तै शब्द अजून माझ्या कानात शिरून कानशिले गरम करीत आहे. "तुम्हाला हवा आहे मियाबीबीचा संसार— माझी अडचण होते आहे तुम्हाला. ठीक आहे. जातो मी. परंतु घरी येईन तो मान-चिन्ह घेऊनच." मी तुझी पहिली वाक्ये विसरत होतो. आणि समाधानात होतो की आता तरी याच्या आयुष्याला निश्चित वळण लागेल. याच्या जगण्यात अर्थ प्राप्त होईल. पण अखेर तू तसाही आला नाहीस. आलास तो या तारेच्या स्वरूपात. दोन्ही बाजूंनी टिमक्या वाजवणारे लोक म्हणतात मी तुला लष्करात घातला व अप्रत्यक्षरीत्या तुझा प्राणच घेतला. म्हणू देत. जोपर्यन्त माझी सदसद्विवेक बुद्धी मला धोका देत नाही तोपर्यन्त मला कोणाच्या बोलण्याची पर्वा करण्याची जरुरी नाही. मला ऐवढेच कळते आहे, की मी माझे कर्तव्य केले आहे. या जन्मी जे साध्य झाले नाही ते पुढच्या जन्मी साध्य होवो हीच तुझ्या आत्म्याला प्रार्थना.


अक्का


बाळू! आईच्या डोळ्यांतील पाणी खळत नाही. अण्णा डोके धरून बसला आहे. आणि मी! मला वाटते तू उद्या आपल्या घरी परत येणार आहेस. ये. तू रागावू नकोस हं. पण खरंच तुला सांगते रे! सगळीजण रडत आहेत, पण मला नाही रडू येत. आम्हाला सोडून तू दूर गेलास तेव्हा तुला आले का रडू? मग मी कशाला तुझ्यासाठी रडू? मला माहीत आहे की ही तुझी मस्करी आहे. नाहीतर तू फारच खटयाळ आहेस हं. एकदा तुला आठवतं? तू इथून जाण्याअगोदर तुला थोडासा ताप आला होता. म्हणून आईने तुला घरी निजून राहायला सांगितले होते. माझा पण पाय काचेने कापला होता म्हणून मी शाळेत गेले नव्हते. आई गेली मामाकडे, अण्णा गेला ऑफिसात. मग मी तुला कॉफी करून दिली. मला काही नीट करता येत नव्हती पण तू हट्टच धरलास म्हणून केली. तू गादीवर पडला होतास. मी तुझ्याशेजारी शाळेतल्या गमतीजमती सांगत होते. तुझे लक्षच नव्हते माझ्याकडे. मी तुला माझे प्रगतिपुस्तक दाखविले तर तू माझ्याकडे पाठच फिरविलीस आणि एकदम वळून म्हणालास "मुन्नी मी जर मेलो तर तुला काय वाटेल?" मी एकदम हसतच सुटले. असे प्रश्न का कोणी कधी विचारतो? आणि मला हसताना पाहून तुझा चेहरा एकदम बदलला! तू हातपाय ताठ केलेस, डोळे एकदम वर नेलेस आणि मान टाकलीस. मी कित्ती कित्ती भ्याले. मी रडू लागले. जोरजोरात ओरडू लागले. पण शेजारी कोणीच नव्हते. थोडया वेळाने अचानक अण्णा घरी आला. त्याच्या पावलांचा आवाज ऐकताच तू एकदम उठून बसलास. पण मी अण्णाला सांगितले नाही हो तुझे नाव! नाही तर अण्णा तुला रागावला असता,

ही पण तुझी मस्करीच असणार. जायच्या आधी तू मला कबूल केले आहेस की, मी तुला राखी पौर्णिमेला भेटायला येईन आणि तुझ्यासाठी गंमत आणीन. मला इतक्या वर्षांत आठवत नाही की तू राखी पौर्णिमेला आणि भाऊबीजेला इथे नाहीस• तू कामासाठी नेहमी कुठेतरी बाहेर जायचास. कितीतरी दिवस यायचा नाहीस. आईने रडून सांगितले की जाऊ नकोस तरी जायचास. इतके का कुठे बाहेर काम असते ! पण कुठेही असलास तरी राखी पौर्णिमेला आणि भाऊबीजेला न चुकता यायचास.

एकदा पहाटे तू आलास. मी गॅलरीमध्ये पणतीवर फुलबाजी लावीत होते. पहाटेच्या त्या काळोखात मी तुला एकदम ओळलेसुद्धा नाही. दाढी वाढविली होतीस. तो आपल्या पलीकडे बोहोरी राहतो ना त्याच्यासारखी. दिवाळी होती तरी कपडे किती घाणेरडे घातले होतेस. तरी पण तू आलास म्हणून मला आनंद झाला होता. तू मला सांगितलेस. " मला थांबायला वेळ नाही. आज भाऊबीज म्हणून मी आलो आहे, चल झटपट आटप, मला ओवाळतेस ना ? " इतक्या पहाटे का कोणी ओवाळते ! तुझा आवाज ऐकून आई बाहेर आली. तुला बघून ती रडायला लागली. ती नेहमीच तसं करते. ती म्हणाली, "अरे बाळ, ३ दिवस मी तुझी सारखी वाट पाहते आहे रे. निदान सणासुदीला तरी घरी राहात जा. तुला त्याबद्दल काही वाटत नाही. पण माझंच आतडं तुटतं. आता आल्यासारखा राहा. लगेच जाऊ नकोस." पण तू तिचे ऐकले नाहीस. अण्णा आंघोळीला गेला होता. तू स्वतःच पाट मांडून बसलास पण देवांकडे पाठ करून. तुझे सगळेच विचित्र. मी तुला ओवाळले, तू तबकात झगझगीत जरीचा लाल रेशमी फ्रॉक घातलास. मला तो फ्रॉक बघून इतका आनंद झाला की तो फ्रॉक घेऊन मी धावत धावत शेजारी आनंदाकडे गेले. सगळ्यांना तो फ्रॉक दाखवत होते. पण घरात आले तो सगळेच बदलले. तू खाली मान घालून बसला होतास. आंघोळ करून आलेला अण्णा तुला रागावून बोलत होता. आई रडत होती. आणि शेवटी तू समोर ठेवलेले फराळाचे ताट न खाताच निघून गेलास. मी गुपचूप तो फ्रॉक घालायला लागले तेवढ्यात अण्णा आला, आणि त्याने खसकन माझ्या हातातून तो ओढून घेतला आणि म्हणाला " हे पाप माझ्या डोळ्यांसमोर नाचवू नकोस." फ्रॉक कधी पाप असतो ! मी इतका रडून गोंधळ केला तरी मला अजून तो फ्रॉक मिळाला नाही. उद्या मला येताना तसा आणशील ? पण तसला पापी नको हं ! चांगला आण नाहीतर परत अण्णा तो टाकून देईल. अरे पण तू उद्या आलास ना, तर अण्णा, तुझ्यावर रागावणार नाही. कारण त्याला खरेच वाटते आहे की तू मेलास. तो हळूच चोरून रडतो. म्हणून तू उद्या आलेला पाहून त्याला आनंदच होईल. मग मज्जाच मज्जा !

O





शेतीसाठीं
महाराष्ट्र बँक सहाय्य करते.

आपल्या नजिकच्या शाखेस भेट द्या

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**



११९ शाखासह आपल्या सेवेस सिद्ध



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ☐ माओ-वचने की दरिद्रता ?

कुठलीही गोष्ट करताना आधी एखादे प्रसंगोचित माओ-वचन वापरायचे असा म्हणे लाल चीनमध्ये खाक्या सुरू झाला आहे. उदाहरणार्थ, मध्यंतरी एका अमेरिकन विमानाने चिनी हद्दीत अतिक्रमण केले तेव्हा त्याला पाडण्यासाठी चिनी वैमानिकांना हुकूम देताना तो माओ-वचनाच्या स्वरूपात देण्यात आला- "भांडवलवादी शत्रूवर दया दाखवू नका." याच्या पुढची पायरी म्हणजे चीनमध्ये टेलिफोन-ऑपरेटरला वेळ विचारली, तर आधी तो एखादे माओ-वचन म्हणतो व मग वेळ सांगतो. मला वाटते ही अफलातून कल्पना हिंदुस्थानात अमलात आणण्याला काहीच हरकत नाही. कारण सुभाषितांच्या मेंड्या लावणाऱ्या आपल्या मंडळींना ते कठीण नाही. शिवाय संभाषणात लज्जत येईल ती निराळीच. उदाहरणार्थ-

काय हो किती वाजले ?

घटका जाती, पळे जाती, तास वाजे ठणाणा – सव्वासात वाजले.

अग ए, चहा झाला की नाही अजून ?

सहसा विदधीत न क्रियाम् – आताच आधण टाकलंय.

बायको- गडे मला हिऱ्याच्या कुड्या घेऊन द्या नं......

नवरा- जातीच्या सुंदरा काहीही शोभते – तुझ्या कानांत काही नसतानाच तू खरी सुंदर दिसतेस. (शिवाय एवढे पैसेही नाहीत.)

आई- बाळ्या, जेवायला चल पाहू...

बाळ्या- उदर भरण नोहे जाणिजे यज्ञकर्म – कसली आमटी केलीय ?

तो- माझे तुझ्यावर फार फाऽऽर प्रेम आहे.

ती- क्षण एक पुरे प्रेमाचा – उशीर झाला बाई, घरी आई वाट बघत असेल.

दुष्यंत हेअर-ऑईलची किंमत काय हो ?

दुकानदार- प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलहि गळे – लहान बाटली साडे सहा रुपये, मोठी पावणे दहा.

मिलमालक- तुमची काय मागणी आहे ?

मजूर नेता- आराम हराम है – कामाचे तास कमी करा.

राव- काय पंत, सारखे सू-सू करताय, सर्दी झालीय वाटतं ?

पंत- सू सणणण सायकसा स्मरारि सामकसा – हो जरा सर्दी झालीय.

आई– अरे वसंता, त्या नागपूरच्या परांजप्यांची मुलगी सांगून आलीय, पाहतोस का ?

वसंता– गृहं तु गृहिणीहीनम् कांतारादतिरिच्यते – यंदा कर्तव्य नाही.

पार्लमेंटमध्ये प्रतिपक्ष– आजकाल देशात सर्वत्र दंगेधोपे चालू आहेत यावर सरकार काय उपाययोजना करीत आहे ?

गृहमंत्री– आनंदी आनंद गडे इकडे तिकडे चोहिकडे – परिस्थिती गंभीर असली तरी आटोक्यात आहे.

सिने-साप्ताहिकाचा वार्ताहर– आपल्या सदैव खुलणाऱ्या सौंदर्याचे रहस्य काय ?


सिनेमा नटी– मन नाही निर्मळ, काय करील साबण – मी नेहमी डी-लक्स साबू वापरते.

कवीचे पत्र– सोबत एक कविता प्रकाशनार्थ पाठवीत आहे. ती छापली नाहीत तरी माझे नाव तेवढे ठळक टाइपात छापावे.

संपादकाचे उत्तर– दिव्यत्वाची जेथ प्रचीती तेथे कर माझे जुळती – आपली कविता (आपल्या नावासकट) साभार परत पाठवीत आहे.

## ☐ छडी मारणारा कॉम्प्युटर

छडी लागे छम्छम् विद्या येई घम्घम् हे कधीच खरे नव्हते हे आपल्याला एकदम मान्य आहे. कारण अस्मादिकांच्या हातावर शाळेत छडीचा बराच छमछमाट झाला होता तरी डोक्यात विद्येचा घमघमाट मात्र कधीच सुटला नाही. रम्य त्या बालपणी छडी अन् माणूस मिळून मास्तर होत असे अन् मास्तराशिवाय विद्या शक्य असली तरी शाळा अशक्य आहे असे माझे अजूनही ठाम मत आहे. उलट परवा वर्तमानपत्रात वाचले की पश्चिम जर्मनीत थोड्या दिवसांपूर्वी एका शाळेत मास्तरच्याऐवजी कॉम्प्युटर यंत्राने तास घेतला. छे, छे, हे ऑटोमॅटिक शिक्षण काही बरोबर नाही बुवा ! समोर मास्तर नसला की मुलांचे जे अनेक तोटे होतात ते कोणताही सुशिक्षित कॉम्प्युटर भरून काढू शकणार नाही. उदाहरणार्थ, मी शाळेत बाकावर बसताना ते जरा झाडून बसायचा अन् मग मास्तर न चुकता खेकसायचे– "पँट मळण्यापेक्षा आयुष्य मळतय तिकडे जरा लक्ष द्या." हे प्रेमळ खेकसणे कोणत्या कॉम्प्युटरला जमेल ? आमचे एक मास्तर आगगाडीच्या इंजिनसारख चालायचे तर दुसरे एक मास्तर खाली पाहून हळूहळू चालायचे, म्हणून एका वात्रट विद्यार्थ्याने पहिल्या मास्तरांचे टोपण नाव 'भपभप–गाडी' अन् दुसऱ्या मास्तरांचे 'सूनबाई' ठेवले होते. पण कॉम्प्युटर–मास्तरला पाहून कुठल्या मुलाला वात्रटिका सुचेल ? या मेकॅनिकल मास्तरापासून मुलाला आपला कान उपटला जाण्याची भीती नाही खरी, पण स्कॉलर मुलाला 'सरचा पेट' होण्याचा स्कोपही नाही. अन् सर्वात महत्त्वाचे म्हणजे "सर, एकी ?" या यक्ष-प्रश्नाचे उत्तर कोठल्या कॉम्प्युटर-मास्तरला देता येईल ? ○



# पुस्तके

**प्रा.** वा. ल. कुलकर्णी हे नाव अलिकडील मराठी साहित्याशी अकृत्रिमतेने निगडित झालेले आहे. ‘साहित्याची समीक्षा’ हा विषय या पूर्वीच्या काळात मास्तरकीच्या थाटात अवतरलेला होता. ‘समीक्षा’ म्हणजे कलाकृतीवर ओढलेले आसूड अशीच जणू तेव्हाची समीक्षेची व्याख्या होती. पाश्चात्त्यांच्या किंवा परकीयांच्या साहित्यशास्त्रातून उचललेल्या ठोकळेबाज नियमांचे वेडगुजरी मराठीकरण करून त्याच्या साह्याने नवजात मराठी कलाकृतींना घेरून मारण्याचा तो एक क्रूर खेळ होता !

गेल्या तीस–चाळीस वर्षांतील मराठी टीकेचा आणि टीकाकारांचा इतिहास पाहिला तर माझ्या वरील विधानाचे प्रत्यंतर सहज येईल. त्याच्या समर्थनार्थ निराळी साक्ष काढण्याची गरज नाही.

असल्या निर्दय आणि ठोकळेबाज टीकेचा तेव्हाच्या ललित साहित्यावर काय परिणाम झाला याची नोंदही मराठी सारस्वतांत सहज सापडते. तेव्हाच्या कलावंतांचं आणि टीकाकारांचं विळ्या–भोपळ्याइतकंच सख्य होत, याचीहि नोंद साहित्याच्या इतिहासात सापडते. इतकेच नव्हे तर अगदी अलिकडे फडके, खांडेकर, माडखोलकर आणि अत्रे गेल्या पिढीतील प्रतिभावंत लेखक असूनसुद्धा, ते वरच्या दर्जाचे टीकाकार नसल्यामुळे, या लोकांनी एकीकडे उत्तम दर्जाची कलानिर्मिती करीत असताना दुसरीकडे आपल्या टीकेने एकमेकांच्या कलाकृती विदीर्ण करून टाकलेल्या आहेत. आज ती माणसे कलावंत असूनदेखील एकमेकांशी

**वि. शं. पारगावकर**

# मराठी समीक्षेची पातळी उंचावणारा ग्रंथ

सहभाव दाखवू शकत नाहीत याचं खरं आणि एकमेव कारण म्हणजे त्यांची एकांगी टीकापद्धती हेच होय.

गेल्या पिढीतील सानेगुरुजी हे लेखक-कलावंत म्हणून महान नसले तरी त्यांच्यावर आणि त्यांच्या साहित्यावर ज्या प्रकारची टीका झालेली आहे, ती टीकापद्धती मराठी टीकेला निश्चितपणे काळिमा फासणारी आहे, असे म्हटल्यावाचून गत्यंतर उरत नाही.

अशी ही गेल्या काही वर्षातली मराठी टीकेची पद्धती डागाळलेली आहे.

या पार्श्वभूमीवर आजचे टीकाकार प्रा. वा. ल. कुलकर्णी उभे आहेत. टीकाकार या शब्दाला अर्थाची एक नको ती डूब चढलेली असल्यामुळे तो शब्द वा. ल. कुलकर्णी यांच्या संदर्भात वापरणेदेखील चूक वाटावे इतका आजच्या टीकेचा दर्जा त्यांनी निश्चितच वाढविला आहे. ' साहित्य : शोध आणि बोध ' या त्यांच्या नव्या ग्रंथाच्या संदर्भात मी लिहीत असलो तरी गेल्या एक–दीड तपात त्यांनी ललित साहित्याच्या निरनिराळ्या प्रकारांवर आणि प्रक्रियांवर जे लेखन केलेले आहे, त्या लेखनाची भूमिका आणि प्रतिज्ञा मराठीच्या टीकाशास्त्रात नवचैतन्य निर्माण करणारी आहे.

' वाङ्मयातील वादस्थळे ', ' वाङ्मयीन मते आणि मतभेद ', ' वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणी ', ' वाङ्मयीन दृष्टी आणि दृष्टिकोण ', ' साहित्य आणि समीक्षा', अशी आजवर त्यांची सहा पुस्तके साहित्य–विषयक विचारावर लिहिली गेलेली आहेत.

वा. ल. कुलकर्णी यांच्या लेखनाचे एक वैशिष्ट्य असे आहे की, त्यांचे सारे लेखन संशोधनाच्या भूमिकेवरून झालेले आहे. त्यांच्या नव्या ग्रंथाचे नाव ' साहित्य : शोध आणि बोध ' आहे. त्यातदेखील शोध या शब्दाने प्रतीत होणारी जी त्यांची भूमिका आहे तीच महत्त्वाची आहे.

फडके-खांडेकर यांच्यानंतर ललित साहित्यात जी एक नवीन पिढी आली तिचा

दृष्टिकोण आणि कलानिर्मिती ही अगदी नवीन होती. ललित कृतीची भाषा, शैली, रूप, तिच्यात व्यक्त होणारे जीवन आणि त्या जीवनचित्रणातील अभिव्यक्तीची कलावंतांनी घेतलेली शपथ या सर्वच बाबतीत या नव्या पिढीचे साहित्य जुन्यांपासून शेकडो मैल पुढे होते. काव्यात मर्ढेकरांपासून दिलीप चित्रेपर्यंत, कथेत गंगाधर गाडगिळांपासून शरद्चंद्र वासुदेव चिरमुले यांच्यापर्यंत, कादंबरीत श्री. ना. पेंडसे यांच्यापासून भालचंद्र नेमाडे यांच्या एकमेव कादंबरीपर्यंत आणि नाटकात वसंत कानेटकर यांच्यापासून विजय तेंडुलकरांपर्यंत नवसाहित्याचा जो एक नवीन आलेख तयार झालेला आहे, त्याच्या सर्वांगीण स्वरूपाचे मर्मग्राही दर्शन जर कोणी घडविले असेल तर ते प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनीच; यांच्या व्यतिरिक्त कोणीही नाही.

## मूलगामी विवेचन

ललित साहित्याच्या सर्व बारीक-सारीक प्रक्रियांवर त्यांनी विचार केलेला आहे. आणि त्यांचा हा विचार आणि विवेचन मूलगामी आहे. १९४९ साली प्रथम प्रकाशित झालेल्या त्यांच्या ' वाङ्मयीन मते आणि मतभेद ' या ग्रंथात त्यांनी ' शीर्षकांचा प्रश्न व नवलेखनाचे स्वरूप ' या विषयाचा एक लेख लिहिलेला आहे. त्यामध्ये प्रभाकर पाध्ये यांची ' करपलेले अंकुर ' ही त्या वेळी प्रसिद्ध झालेली कथा— तिच्या शीर्षकाच्या निमित्ताने वा. ल. कुलकर्णी यांनी ' शीर्षकांच्या प्रश्नावर ' विवेचन केलेले आढळते. " ललितकृती निर्माण होण्याची क्रिया व त्या क्रियेला शीर्षक देण्याची क्रिया ह्या दोन क्रिया भिन्नस्वरूपी आहेत. पहिली भावप्रेरित आहे तर दुसरी तर्कप्रेरित आहे. कलाकृती निर्माण होत असतांना आपल्या ठिकाणच्या निर्मितीच्या ज्या शक्ती कार्य करीत असतात त्यांपेक्षा भिन्न स्वरूपाच्या शक्ती त्या कलाकृतीला शीर्षक देत असताना कार्य करीत असतात. आपण कथा लिहून टाकतो व मग त्या कथेला ' समर्पक ' (?) असे शीर्षक सापडते काय हे ' शोधीत ' बसतो......"

वरील उदाहरण आणि अवतरण देण्याचे कारण एवढेच की वा. ल. कुलकर्णी यांनी कलानिर्मितीच्या वरवर सामान्य वाटणाऱ्या, परंतु कलेशी त्यांचा अतूट संबंध असणाऱ्या कितीतरी गोष्टींवर विचार केलेला आहे. शिवाय मी वर म्हटल्याप्रमाणे या विचारांची भूमिका पंतोजीच्या थाटाची नसून एका सच्चा संशोधकाची आहे.

त्यांच्या ' साहित्य : शोध आणि बोध ' या प्रस्तुत ग्रंथातील दुसराच लेख ' साहित्य आणि इतिहास ' हाही अशाच दृष्टिकोणासाठी उदाहरण म्हणून घेता येईल. इतिहास आणि (ललित) साहित्य यांचे नाते काय असते याविषयी वरील लेखात त्यांनी विवेचन केलेले आहे. बखरगद्य आणि इतिहास, बखरगद्य आणि ललितकृती, इतिहास आणि ऐतिहासिक ललितकृती, इतिहास, ललित कृती आणि दंतकथा (Myths) यांचे एकमेकांशी असणारे नाते, यांचा अत्यंत वरच्या आणि विशुद्ध भूमिकेवरून

त्यांनी विचार केलेला आहे. इतिहास आणि साहित्य यांचे परस्पर संबंध लक्षात घेतानाच कलाकृतीसाठी ज्या ऐतिहासिक घटनांचा ,वापर कलावंत करीत असतो त्या घटनांचे विश्लेषण कसे करता येईल हे वा. ल. कुणकर्णी यांनी दाखवून देताना अगदी नवाच दृष्टिकोण स्वीकारलेला आहे. तसेच पुराण आणि महाकाव्य ह्यांमधून जन्माला येणारे कथात्मक व नाटचात्मक साहित्य यांत बरेचसे प्रकृतिसाम्य आहे. ह्या साहित्याच्या संबंधात पुराणे आणि महाकाव्य हा इतिहासच आहे. इतिहास आणि पुराणे अथवा महाकाव्ये यांचे प्रकृतिधर्म निश्चित करण्यासाठी त्यांनी वापरलेला दृष्टिकोण तर्कशुद्धच केवळ नव्हे तर वास्तववादी आहे असेच म्हणावे लागेल.

पुराणे आणि महाकाव्ये ही मूलत: साहित्यच असली तरी जनमानसात त्यांना इतिहासाचे स्थान मिळालेले आहे. कारण त्यामधील व्यक्ति आणि प्रसंग जनमानसाच्या सांस्कृतिक जीवनाचाच एक अविभाज्य भाग बनलेले असते. इतकेच नव्हे तर मला वाटते ते असे की, महाकाव्ये आणि पुराणातील व्यक्ति आणि घटना या इतिहासातील व्यक्ती आणि घटनांपेक्षा जनमनावर ठसा उमटविण्याच्या दृष्टीने अधिक प्रभावी असतात.

अर्थात पुराणे आणि महाकाव्ये यांतून निर्माण होणाऱ्या कलाकृती ' ययाती ' वगैरे आणि इतिहासातून निर्माण होणाऱ्या कलाकृती, ' झुंज ', ' झेप ', ' स्वामी ' वगैरे, यांचे कलाकृती म्हणून मूल्यमापन करताना काही बंधने पाळावीच लागतात. ऐतिहासिक कादंबरी लिहिताना कादंबरीकारावर ज्या प्रकारची बंधने येऊन पडतात तशी आणि तेवढी बंधने पुराणातील घटना घेऊन लिहिल्या जाणाऱ्या कादंबरीवर साहजिकच येत नाहीत. वरील सर्व घटकांचा विचार त्यांच्या ' साहित्य आणि इतिहास ' या लेखात केलेला आढळतो.

त्यानंतरचा तिसरा लेख ' इतिहास आणि ललितलेखन ' ही वसंत कानेटकर यांच्या ' रायगडला जेव्हा जाग येते ' या नाटकाच्या दुसऱ्या आवृत्तीला लिहिलेली प्रस्तावना आहे. या लेखात इतिहास, चरित्र आणि ललितकृती यांच्या प्रतिज्ञांचा आणि प्रक्रियांचा विचार केलेला आहे. इतिहासाच्या चौकटीतून व्यक्तीचे जीवन जे वाचकाला परिचित होते ते सर्वांगीण नसते. तसेच चरित्रलेखनातून व्यक्त झालेल्या जीवनालाही अनेक मर्यादा पडलेल्या असतात. तेच जीवन ललितकृतीमधून जेव्हा व्यक्त होते तेव्हा एखाद्या त्रिमितिचित्राप्रमाणे त्याच्या अनेक पैलूंचे दर्शन वाचकाला घडत असते. अर्थात इतिहासाची अनेक बंधने येथे कलावंताला पाळावीच लागतात. परंतु ती पाळूनदेखील आपल्या प्रतिभेच्या आणि कल्पनाशक्तीच्या साह्याने कलावंत अशा ऐतिहासिक व्यक्तीमध्ये जिवंत मासांचे चैतन्य, रक्ताची उष्णता आणि हृदयाचे स्पंदन निर्माण करू शकतो. मराठी वाङमयात हरिभाऊ आपटे यांच्यापासून ना. सं. इनामदार यांच्यापर्यंतच्या लेखकांनी कितीतरी दर्जेदार ऐतिहासिक कलाकृती निर्माण केलेल्या आहेत.

मात्र ज्या रायगड...च्या निमित्ताने वा. ल. कुलकर्णी यानीं 'इतिहास आणि ललित लेखन' लिहिला आहे त्या नाटकाचे नाटयगुण आणि त्याची प्रयोगक्षमता मान्य करूनही इतिहासातील श्रेष्ठ व्यक्ती म्हणून शिवाजीचे चित्रण येथे यशस्वी झालेले नाही. वा. ल. कुलकर्णी यांनी वरील लेखात नाटकाचे या दृष्टीने रसग्रहण केलेले नाही हे एक त्या लेखातील वैगुण्य मानावे लागेल. येथे शिवाजीचे कौटुंबिक जीवन दाखविण्याच्या आवेशात कानेटकरांनी व्यक्तित्वसंपन्न व्यक्तीच्या मनोव्यापारांकडे आणि मनोधर्मांकडे दुर्लक्ष केलेले आहे असे क्षणोक्षणी जाणवते. ज्या अष्टप्रधानांच्या साह्याने शिवाजीने स्वराज्य निर्माण केले ते कारभारी, कानेटकरांनी फार सामान्य माणसे समजून रंगविलेले आहेत.

खानदानी घराणं, कर्तबगार, धीरगंभीर स्वभावाच्या व्यक्ती कुठेही गेल्या तरी आपले मनोधर्म बरोबरच घेऊन जाणार. रणांगणावरचा शिवाजी शोकमग्न झाला तरी तो ढसढसा रडणार नाही. याचा अर्थ एवढाच की इतिहासामधून, Myths मधून शिवाजीचे जे व्यक्तिमत्त्व दिसते, त्याच्याशी पूर्ण प्रामाणिक राहून त्या व्यक्तीचे गृहजीवन ठरवावे लागेल. खून झालेल्या मनुष्याचा एखादा अवशेष सापडल्यास, त्या अवशेषावरून मूळ व्यक्ती कशी असेल, याचा जसा शोध लावला जातो, त्याच प्रकारच्या शास्त्राची जोड कलावंताच्या प्रतिभेला आणि कल्पनाशक्तीला व्यक्तिनिर्मितीच्या संदर्भात असणे आवश्यक असते. मी म्हणतो, हा दृष्टिकोण जर योग्य म्हणून पत्करला तर मग त्या अनुरोधाने 'रायगडला जेव्हा जाग येते' या नाटकातील शिवाजीचे गृहजीवन आणि त्यातील नाटय मूळ व्यक्तीवर अन्याय करणारे वाटते. अर्थात, या मुद्द्यावर वा. ल. कुलकर्णी यांची मते काय आहेत, ते स्पष्ट झालेले नाही.

तसेच १९६५ साली हैद्राबाद येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून वा. ल. कुलकर्णी यांनी केलेले भाषणही येथे संग्रहीत केलेले आहे. त्या भाषणातील विचारांविषयी त्या वेळी अनेक नियतकालिकांतून लिहिले गेलेले असल्यामुळे त्याची पुनरुक्ती मी येथे करीत नाही. या बाबतीत एवढे सांगितले म्हणजे पुरे की, हे भाषण जेवढे मूलगामी आणि प्रभावी आहे तेवढेच ते वादग्रस्त आहे. मला वाटते, साहित्य परिषदेसारख्या संस्थांनी अशा प्रकारच्या महत्त्वपूर्ण भाषणांवर एखादा परिसंवाद, एखादी चर्चा घडवून आणली पाहिजे. साहित्य परिषद अशा दृष्टीने विचार करील, अशी आशा बाळगतो.

शेवटी या ग्रंथातील वा. ल. कुलकर्णी यांचे सर्वच टीकालेख मराठी समीक्षेची पातळी निश्चितपणे उंचावणारे आहेत, इतकेच नव्हे, तर त्यांनी मराठी समीक्षेला एक उच्च दर्जा मिळवून दिलेला आहे. हे त्यांचे मराठी साहित्यावर मोठेच ऋण आहे. _ ◻

**[ साहित्य : शोध आणि बोध, लेखक : वा. ल. कुलकर्णी,**
**पॉप्युलर प्रकाशन : पृष्ठे २०८ : कि. आठ रुपये. ]**



# हर हर महादेव

ब. मो. पुरंदरे

राजश्री गोपाल नीलकंठ दांडेकर यांची ही शिवकालावरची दुसरी कादंबरी. एकूण पांच कादंबऱ्यांत ते सारा शिवकाल मराठी वाचकांच्या डोळ्यांपुढे उभा करणार आहेत. 'बया दार उघड' व 'हर हर महादेव' ह्या दोन कादंबऱ्या वाचल्यावर राजश्री आप्पासाहेब दांडेकरांचा हा अवघड मनसुबा फत्ते होणार अशी ग्वाही मिळत आहे.

आजपर्यंत मराठीत ज्या ऐतिहासिक कादंबऱ्या झाल्या, त्यांचा पोत आणि राजश्री आप्पासाहेबांच्या प्रस्तुत ऐतिहासिक कादंबऱ्यांचा पोत अगदी वेगळा आहे. 'उषःकाल'पासून 'झुंज'पर्यंतच्या कादंबऱ्या कोणातरी नायकाच्या जीवनाभोवती किंवा एखाद्या प्रसिद्ध प्रभावी ऐतिहासिक घटनेभोवती डौलात उभ्या आहेत. ते लेखन त्या मानाने थोडे सोपेच होते. कारण नायक, नायिका व घटना यांच्यावर वाचकांचे लक्ष सहज केंद्रित होते व तो मंतरल्यासारखा आपोआप कादंबरीच्या शेवटापर्यंत त्या नायकांच्या वा घटनांच्या मागोमाग चालत जातो. अर्थात त्यातही त्या कादंबरी लेखकांचे कसब असतेच. त्यातही त्या लेखकांची लेखणी पणाला लागलेली असतेच. परंतु घटनाप्रधान किंवा ऐतिहासिक व्यक्तिप्रधान कादंबऱ्याहूनहि श्री. अप्पासाहेब दांडेकरांच्या प्रस्तुत कादंबऱ्यांची घाटणी अगदी वेगळी आहे. त्यांच्या ह्या कादंबऱ्या व्यक्तिप्रधान वा घटनाप्रधान नाहीत. त्या आहेत कालप्रधान वा परिस्थितिप्रधान. शिवकालीन समाजस्थिति हीच प्रस्तुत कादंबऱ्यांची नायिका

असून, शिवकालीन इतिहास हा त्यांचा नायक आहे. कोणाही विशिष्ट व्यक्तीला वा घटनेला प्राधान्य न देता ' शिवकाल ' व शिवकालीन ' देशलोकस्थिति ' ललित लेखनातून प्रभावीपणे मांडावयाची ही मोहीम सामान्य नव्हे. कादंबरी ऐवजी निबंध होण्याचाच यात संभव जास्त ! पण श्री. गो. नी. दांडेकर यांनी मोठ्या तालेवारीने कादंबरीच्या अवघड गडाला तोरण लावले आहे, निशाण चढवले आहे.

## अभ्यासकाची दृष्टी

' हर हर महादेव ' ह्या कादंबरीत शिवाजीमहाराजांच्या व हिंदवी स्वराज्याच्या उदयाचा कालखंड आला आहे. मावळपट्टीत सुलतानी अम्मल कसा होता, मावळी मने आणि मनगटे त्या अमलाच्या धाकाखाली कशी जगत होती अन् कशी आतल्या आत चरफडत होती याचे अत्यंत प्रभावी चित्रण 'हर हर महादेव 'मध्ये आले आहे. इथे क्रांति जन्माला आली. ठिणगीची ज्योत झाली अन् ज्योतीची ज्वाला ! सुलतानी अम्मल त्यात होरपळून गेला. पण हे केवळ योगायोगाने घडत गेलेले नाही. त्यामागे काही योजनाबद्ध प्रयत्न, ध्येयवाद व उदात्त तत्त्वज्ञान होते आणि तेच शेवटी यशस्वी झाले. अडाणी पण प्रामाणिक मावळ्यांना त्या तत्त्वज्ञानातील कदाचित कानामात्रावेलांटीहि उच्चारून वा लिहून दाखविता आली नसेल; पण हे ' आपलं स्वतःचं ' ' देवाधर्मांचं ' ' गोरगरिबांचं ' ' मायबहिणींचं ' राज्य होणार आहे हा ठाम विश्वास ह्या मनात आणि मनगटात त्या क्रांतीच्या तरुण नेत्याने पेरला. सुरुंगाच्या दारूसारखा ठासून भरला अन् मग त्या नेत्याच्या नजरेची नुसती ठिणगी पडताच, स्वसुखाची पर्वा न करता, हे सुरुंग सुलतानी तख्ताखाली उडाले. हिंदवी स्वराज्य असे जन्माला आले. पण हा सारा पोत शिवकालात कसा कसा भरला गेला; त्यात देशलोकपरिस्थितीचा, भोसले मायलेकरांचा व संतसंप्रदायाचाही भाग कसा होता हे ' हर हर महादेव 'मध्ये श्री. गो. नी. दांडेकरांनी फारच कौशल्याने कशीदले आहे. हा कशिदा केवळ शब्दांच्या रेशमी धाग्यांनी विणलेला नाही. ह्या रेशमी धाग्यांच्या सुरवातीला अभ्यासाची टोकदार सुई आहे व होती हे पानापानावरून दिसून येईल. शिवकाल उभा करताना श्री. गो. नी. दांडेकरांनी अपार वाचन केले. कादंबरीच्या हस्तलिखिताइतकीच टिपणे काढली, स्वतः मावळपट्ट्यांत रानावनातून, कडेकपाऱ्यातून, गडाकोटातून आणि दऱ्याभुयारातून हिंडले. घराणी पाहिली, परंपरेचे रीतरिवाज पाहिले, जत्रा पाहिल्या, गोंधळ, पोवाडे, छबिने, मानपान, भांडणे, बगाडे, वाघेमुरळ्या— सारे सारे त्यांनी रमून रंगून पाहिले. कागदपत्रे, बखरी, पोवाडे व संतवाङ्मय यांत दिसणारा शिवकाल व शिवकालीन देशस्थिती गडकोटांशी व मावळपट्ट्याशी ताडून तोलून पाहिली. हत्यारे पात्यारे कपडेलत्ते, दागदागिने न्याहळून निरखून पाहिले. भवानीच्या मळवटात आणि खंडोबाच्या भंडाऱ्यात रंगले अन् मगच लेखणी उचलून ते गरजले हर हर महादेव ! हर हर महादेव !

श्री. आप्पासाहेबांनी ' हर हर महादेव ' मध्ये वापरलेली बोली भाषा ऐन शिवकालीन रंगाढंगांची आहे. त्यांनी लिहिलेले संवाद खरोखर प्रत्ययकारी आहेत. शिवकालीन वाङमय पचवल्याखेरीज अशी भाषा साधणारच नाही.

इतिहास व ऐतिहासिक कादंबरी यांत फरक असणारच. इतिहास बराचसा अबोल असतो. तो फार थोडे बोलतो. अधूनमधून बोलतो. त्यामुळे गतकालाचे सलग, अखंड, सुसंबद्ध व सुस्पष्ट असे चित्र आपल्याला इतिहासातून – विशेषत: शिवकालीन इतिहासातून लाभत नाही. हे अस्पष्ट रंग व रेषा अभ्यासातून व सुसंगत तर्कातून भरावयाचे व गतकालाची ' ओळख ' पटविणारे चित्र रंगवायचे काम ललित लेखकाचे असते. इतिहासकारापेक्षाही हे काम अवघड व जबाबदारीचे असते. लालित्य सांभाळून ही तारेवरची कसरत त्याला करावयाची असते. श्री. आप्पासाहेब दांडेकर यांनी ही कसरत सफाईने केली आहे. त्याना चढती वाढती पदवी, पावली असे !

श्री तुळजाभवानी त्यांना असेच चढते वाढते यश देवो. ○


" सारे जग श्वास रोखून बसेल "

असे बेगुमानपणे सांगणाऱ्या हिटलरच्या

झंझावाती पुरुषार्थाची कहाणी

नाझी भस्मासुराचा

उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये फक्त

पहिले महायुद्ध संपल्यापासून लेनिन जागतिक कामगार क्रांतीचे स्वप्न पाहात होता.

११ नोव्हेंबर १९१८ रोजी त्याने लिहिले–' क्रांती ठरवून होत नाही ही गोष्ट खरी असली तरी आंतरराष्ट्रीय क्रांती जवळ आली आहे अशी माझी खात्री आहे. या क्रांतीला रोखण्याचे साम्राज्यवादात सामर्थ्य उरलेले नाही. साम्राज्यवादी देश एक दिवस जगाला आग लावतील आणि त्या आगीत त्यांचेच भस्म होईल. क्रांतीला विरोध करणाऱ्यांच्या नशिबी याशिवाय दुसरे काहीही लिहिलेले नाही.'

हातात सत्ता आल्यापासूनच लेनिन जागतिक क्रांतीची तयारी करीत होता. २४ डिसेंबर १९१७ रोजी केंद्रीय सोव्हिएट कार्यकारिणीची बैठक भरून तीत जागतिक क्रांतीच्या तयारीसाठी वीस लाख रूबल्स मंजूर करण्यात आले. यासंबंधीच्या ठरावावर लेनिन, ट्रॉटस्की, बॉंख-ब्रुयेव्हिच आणि गोर्बुनोव्ह यांनी स्वाक्षऱ्या

# व्होल्गा जेव्हा लाल होते

## ८

वि. स. वाळिंबे

केल्या होत्या. या ठरावाचे वृत्त देताना ' इझव्हेस्तिया 'ने म्हटले होते– ' सर्व देशांमध्ये क्रांती घडवून आणण्यासाठी तेथील डाव्या पक्षांना पैशासह सर्व रीतींनी मदत करण्यात यावी. ही मदत करताना तो देश रशियाचा मित्र आहे, शत्रू आहे की तटस्थ आहे याचा विचार करण्याचे कारण नाही.'

या वेळी रशियातील बोल्शेव्हिक राजवट अंतर्गत यादवी युद्धाच्या ज्वालांनी होरपळून निघत होती. तरीदेखील सर्व जगभर कामगारक्रांतीचा वणवा कसा पेटेल हीच लेनिनची मुख्य काळजी होती. महायुद्ध संपल्यानंतर मध्य आणि पूर्व युरोपीय देशांमधील परिस्थिती अतिशय बिकट झाली होती. रणांगणावरून परतणारे सैनिक वैफल्याने ग्रासले होते. जर्मनीतील राजेशाही लयाला गेली होती, ऑस्ट्रिया-हंगेरीचे साम्राज्य कोसळले होते, पोलंड आणि त्यालगतची बाल्कन राष्ट्रे महायुद्धाच्या आघातांनी हादरून गेली होती. ब्रिटन, फ्रान्स आदी विजेत्या राष्ट्रांतील श्रमिक जनताही अस्वस्थ झाली होती. चार वर्षांच्या रणधुमाळीमुळे साऱ्या युरोपला

मानसिक बेचैनी जाणवत होती. ही तगमग कशी दूर करावी यासंबंधी कोणालाच निश्चित रीतीने काहीही सांगता येत नव्हते. एक प्रकारच्या चमत्कारिक नैराश्याने युरोपला मारून टाकले होते. आणि म्हणूनच लेनिन म्हणत होता– ' साम्यवादाच्या विजयाचा क्षण फारसा दूर नाही.'

जर्मनीमध्ये जागतिक क्रांतीची मुहूर्तमेढ करावी असा लेनिनचा विचार होता.

बर्लिनमधील सोव्हिएट राजदूत जोफ यांच्यामार्फत जर्मनीमध्ये साम्यवादी वाङ्मयाचा प्रसार होऊ लागला. जर्मनीतील प्रत्येक प्रमुख शहरामध्ये रशियाच्या धर्तीवर सोव्हिएट स्थापन करण्यात तेथील समाजवादी कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला होता. या सोव्हिएटच्या प्रतिनिधींची बर्लिन येथे जी बैठक भरली होती तिला जोफ्, राकोव्हस्की, राडेक, बुखारिन आणि इग्नाटोव्हा या बोल्शेव्हिक प्रतिनिधींनी हजर राहण्याचे ठरविले होते. परंतु जर्मन लष्कराने या प्रतिनिधींना अड-

---

लेनिन लिहीत होता–

हे साम्राज्यवादी एक दिवस जगाला आग लावतील आणि त्या आगीत त्यांचे भस्म होईल. क्रांती कधी ठरवून होत नसते; तरी पण जगातील क्रांती जवळ आली आहे हे निश्चित समजा............................

---

विले. शेवटी राडेक हा एकटाच कसाबसा वेषांतर करून बर्लिनला पोचला.

जर्मन सोव्हिएट प्रतिनिधींच्या मेळाव्यापुढे बोलताना राडेक म्हणाला की 'जर्मनीत प्रथम स्वतंत्र आणि समर्थ अशा समाजवादी पक्षाची उभारणी करणे आवश्यक आहे.' महायुद्धानंतर जर्मनीत सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे सरकार स्थापन झाले होते. राडेक याने आपल्या भाषणात या सरकारवर हल्ला चढविला. जर्मनीत खरेखुरे क्रांतिवादी सरकार अस्तित्वात आले तर जर्मनी आणि रशिया साम्राज्यवादी राष्ट्रांविरुद्ध यशस्वी झुंज घेऊ शकतील असे राडेक याच्या प्रतिपादनाचे सार होते.

बर्लिनमधील आपल्या वास्तव्यात राडेक याने कार्ल लायबक्नेख्ट याच्याशी एक गुप्त करार केला. या करारान्वये जर्मन सोव्हिएट प्रजासत्ताकाची उभारणी करण्याचा लायबक्नेख्ट याने प्रयत्न करावा व या कार्यात रशिया त्याला शस्त्रास्त्रांसह सर्वतोपरी मदत करील असे राडेकने त्याला अभिवचन दिले आहे. जर्मन सोव्हिएट प्रजासत्ताकाचा अध्यक्ष म्हणून लायबक्नेख्ट याला आपण मान्यता देऊ

असेही या बैठकीत ठरले. राडेकने हे आश्वासन दिल्यामुळे लायबक्नेख्ट आणि रोझा लक्झेंबर्ग यांनी १९१९ च्या जानेवारीमध्ये बर्लिनमधल्या सोशल डेमोक्रॅटिक सरकारविरुद्ध उठाव केला. परंतु तो उठाव अल्पावधीत फसला आणि त्यात लायबक्नेख्ट आणि रोझा लक्झेंबर्ग ठार झाले.

जर्मनीच्या पाठोपाठ हंगेरीत कम्युनिस्टक्रांती घडवून आणण्याचा बोल्शेव्हिकांनी प्रयत्न केला आणि त्यात त्यांना यश आले. बेला कुन याच्या नेतृत्वाखाली हंगेरीत कम्युनिस्ट राजवट प्रस्थापित झाली. १९१९ च्या मार्चमध्ये लेनिनने बेला कुन याच्याशी करार करून रशिया हंगेरीला आर्थिक आणि लष्करी मदत देणार असल्याचे जाहीर केले. रशियाच्या मानाने हंगेरी हे अतिशय लहान राष्ट्र असल्यामुळे हंगेरीतील कम्युनिस्ट राजवट उलथून पाडण्यासाठी ब्रिटन, फ्रान्स आदी लोकशाहीवादी राष्ट्रे जारीने प्रयत्न करतील हे ओळखून लेनिनने बेला कुन याला शक्य ती सर्व मदत देण्याचे ठरविले होते.

बेला कुन याने दोन महिन्यांच्या आतच सर्व उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करून आपल्या साम्यवादी राजवटीच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली. बेला कुन धाडसी पावले टाकत आहे हे पाहताच त्याला उत्तेजन देण्यासाठी लेनिनने कळविले, ' तू आपल्या धोरणात यत्किंचितही बदल करू नकोस. कदाचित तुझ्या साम्यवादी राजवटीबाबत समाजवादी पक्ष कुरकूर करू लागतील. कोणतीही दयामाया न दाखविता तू त्या सर्वांचा निःपात कर. एकदा आपण युद्ध पुकारले की आपल्या प्रतिस्पर्ध्यांना गोळी घालून ठार मारणे हेच आपले कर्तव्य ठरते. '

१२ फेब्रुवारी १९१९ रोजी राडेक याला बर्लिनमध्ये अटक करण्यात आली तेव्हा त्याच्याजवळ येत्या मे महिन्यामध्ये मध्य युरोपमध्ये कम्युनिस्ट क्रांती घडवून आणण्याबाबतचे कागदपत्र सापडले. लाल सैन्याने पोलंडमधून जर्मनीत शिरावे आणि त्या वेळी जर्मनीत कम्युनिस्ट क्रांती घडवून आणावी या लेनिनच्या योजनेचा तपशील राडेकजवळ सापडलेल्या कागदपत्रांमुळे जर्मन सरकारच्या हाती पडला.

हंगेरीतील कम्युनिस्ट राजवट अल्पजीवी ठरली. परंतु त्या काळात बेला कुन सारखे नेते हंगेरीच्या पाठोपाठ साऱ्या युरोपात कम्युनिस्ट क्रांती होईल असा विश्वास बाळगून होते. रशियातील कॅडेट पक्षाचा नेता व सुप्रसिद्ध इतिहासज्ञ पॉल मिलिउकोव्ह या काळात हंगेरीत गेला होता. त्या वेळी बेला कुन त्याला म्हणाला ' येत्या महिन्याभरात आम्ही दोन लाख सैन्य उभारणार आहोत. आपल्या भोवतालच्या सर्व देशांमधील जनता असंतोषाने खदखदत आहे. आम्ही आपल्या क्रांतीचा चेकोस्लोव्हाकियापासून प्रारंभ करणार आहोत. चेकोस्लोव्हाकियानंतर रुमानिया आणि युगोस्लाव्हिया या देशांवर आम्ही लाल ध्वज लावू. हे एवढं कार्य पार पाडायला

आम्हाला तीन महिने लागतील. तेवढ्या वेळात इटली आपल्या क्रांतीत सहभागी झालेली असेल. ८ एप्रिल १९१९ रोजी बर्लिनमध्ये जर्मनीतल्या सोव्हिएट प्रतिनिधींची बर्लिन येथे बैठक भरणार आहे. जर्मनीत बोल्शेव्हिक पक्षाची लोकप्रियता वाढत असल्यामुळे तेथे ही क्रांती घडवून आणणे सोपे जाणार आहे. एकदा जर्मनीत लाल क्रांती झाल्यानंतर या क्रांतीच्या लाटा फ्रान्समध्ये पोचायला कितीसा वेळ लागणार आहे ? त्यानंतर इंग्लंडची पाळी येईल. चेकोस्लोव्हिया, रुमानिया, बल्गेरिया, युगोस्लाव्हिया, इटली, फ्रान्स आणि इंग्लंड या देशांत कम्युनिस्ट क्रांती घडवून आणण्याची आमची योजना सर्व तपशिलासह तयार आहे. यांपैकी एकही देश आम्हाला विरोध करू शकणार नाही.'

आंतरराष्ट्रीय समाजवादी पक्षांची पॅरिस किंवा बर्न येथे बैठक बोलवावी या दृष्टीने ब्रिटिश मजूर पक्ष प्रयत्न करीत असल्याची बातमी १९१९ च्या अखेरीस मॉस्कोमध्ये येऊन पोचली होती. ही परिषद म्हणजे दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी संघटनेच्या पुनरुज्जीवनाचा प्रयत्न ठरेल असे लेनिनला वाटले. त्यामुळे त्याने या परिषदेला विरोध करण्याचे ठरविले. कारण या परिषदेत हुकूमशाही राजवटींचा धिक्कार करण्यात येईल हे त्याला माहीत होते. या परिषदेवर मात करण्यासाठी आपणच एक आंतरराष्ट्रीय साम्यवादी परिषद बोलवावी हा विचार त्याच्या मनात घोळू लागला. समाजवादी पक्ष प्रतिक्रांतिकारक आणि लोकशत्रू असून साम्यवादाशिवाय श्रमिक जनतेचे प्रश्न सुटणार नाहीत असा पुकारा केल्याशिवाय पश्चिम युरोपातील समाजवादी पक्षांना शह बसणार नाही असे त्याला वाटत होते. कसेही करून ब्रिटिश मजूर पक्षाचा समाजवादी शक्तींना एकत्र आणण्याचा प्रयत्न हाणून पाडला पाहिजे या दृष्टीने पावले टाकणे लेनिनला आवश्यक झाले होते.

साम्यवादाशिवाय जगात कोणतीही तत्त्वप्रणाली अस्तित्वात उरता कामा नये हा त्याचा निश्चय होता.

१९१९ च्या जानेवारीमध्ये लेनिनने युरोप आणि अमेरिका येथील कामगारांना उद्देशून एक पत्र प्रसिद्ध केले. रशियन क्रांती होण्यापूर्वी समाजवाद्यांचे दोन आंतरराष्ट्रीय मेळावे भरले होते. या मेळाव्यांचा आणि आपल्या नव्या आंतरराष्ट्रीय संघटनेचा कोणताही संबंध असता कामा नये, म्हणून त्याने या पत्रात 'थर्ड इंटरनॅशनल' स्थापन करण्याचे कामगारवर्गाला आवाहन केले होते. निरनिराळ्या देशांतील कम्युनिस्ट पक्षांची आंतरराष्ट्रीय पातळीवर एकजूट घडवून आणण्याच्या दृष्टीने लेनिनच्या हालचाली सुरू होत्या. मॉस्को येथे मार्चमध्ये 'थर्ड इंटरनॅशनल' भरविण्याचा विचार पक्का झाल्यानंतर २४ जानेवारी रोजी सोव्हिएट परराष्ट्र मंत्री चिचेरिन याच्या सहीने सर्वत्र आमंत्रण-पत्रिका रवाना करण्यात आल्या. या

आमंत्रण-पत्रिकेसोबत धाडलेल्या पत्रात चिचेरिन यान म्हटले होते–" ब्रिटिश मजूर पक्षाने बोलवलेली परिषद म्हणजे श्रमिक जनतेच्या शत्रूंचा मेळावा असून ' थर्ड इंटरनॅशनल 'च्या सर्व मित्रांनी या मेळाव्यापासून अलिप्त राहिले पाहिजे. "

रशियाच्या विरोधाला डावलून ब्रिटिश मजूर पक्षाने बर्न येथे युरोपातील समाजवादी पक्षांचा मेळावा भरविला. क्रांतीनंतर रशियात खरोखरच कशी परिस्थिती आहे याची माहिती मिळविण्यासाठी कॉटस्की याच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ धाडावे, असे या मेळाव्यात ठरले. यामुळे समाजवादी एकजुटीला सुरुंग लावणे, रशियाच्या दृष्टीने आवश्यक झाले होते. बर्न येथील मेळाव्यात सहभागी झालेल्या पक्षांवर प्रतिक्रांतिकारकत्वाचा शिक्का मारण्यासाठी लेनिन, झिनोव्हेव्ह, ट्रॉटस्की, राकोव्हस्की आणि अँगेलिका बालाबानोव्ह हे कम्युनिस्ट नेते अतिशय अधीर झाले होते.

त्यांनी आता ' थर्ड इंटरनॅशनल 'च्या मिषाने कम्युनिस्ट पक्षांची पहिली आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्याचे ठरविले. २ मार्च १९१९ रोजी क्रेमलिन येथे ' कॉमिन्टर्न 'च्या (कम्युनिस्ट इंटरनॅशनल) पहिल्या परिषदेस प्रारंभ झाला. इस्टोनिया, लॅटाव्हिया, लिथुआनिया आणि फिनलंड या जुन्या रशियन साम्राज्यातील देशांचे प्रतिनिधी तेवढे या परिषदेला ' आंतरराष्ट्रीय ' हे विशेषण सार्थ करण्यासाठी जमले होते. या देशांतील तथाकथित कम्युनिस्ट पक्षांच्या प्रतिनिधींची निवड बोल्शेव्हिकांच्या केंद्रीय समितीनेच केली होती. पस्तीस प्रतिनिधी आणि पंधरा पाहुणे यांच्या उपस्थितीत ही परिषद सुरू झाली. याशिवाय रशियाच्या ताब्यात असलेल्या युद्धकैद्यांना आपापल्या राष्ट्रांचे प्रतिनिधी बनविण्यात आले. ही परिषद सुरू होण्याच्या सुमारास रशियात जे इतर युरोपीय जहाल कार्यकर्ते वावरत होते त्यांनाही त्या त्या राष्ट्रांचे प्रतिनिधित्व बहाल करण्यात आले. ह्युगो एबेरलिन हा एकमेव जर्मन प्रतिनिधी सोडला तर इतर सारे प्रतिनिधी कोणाचे प्रतिनिधित्व करीत होते हा एक प्रश्नच होता. एबेरालिनला मात्र जर्मन स्पार्टासिस्ट युनियनने मुद्दाम या परिषदेसाठी धाडले होते.

' कॉमिन्टर्न 'च्या पहिल्या परिषदेचे स्वरूप हे असे नामधारी असल्यामुळ परिषदेत मांडावयाच्या ठरावांबाबत प्रतिनिधींमध्ये अगोदर विचारविनिमय करण्याची लेनिनला मुळीच गरज वाटली नाही. ही परिषद चालू असतानाच ट्रॉटस्की ' कॉमिन्टर्न'चा जाहीरनामा लिहीत होता. या जाहीरनाम्यावर चर्चा करण्याचीही आवश्यकता उरली नव्हती. लेनिन–ट्रॉटस्की जे काही सांगतील त्याला मंजुरी देणे एवढेच या प्रतिनिधींचे काम होते. कॉमिन्टर्नचा जाहीरनामा लिहून होताच ट्रॉटस्की व्यासपीठावर आला आणि त्याने तो वाचून दाखविला. या जाहीरनाम्यामध्ये अखेरीस असे म्हटले होते–' कॉमिन्टर्नच्या नेतृत्वाखाली कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित करण्याच्या लढ्याला आता प्रारंभ होत असून त्यासाठी जगातील कामगारांनो, एक व्हा. '

या जाहीरनाम्यावर ट्रॉटस्की भाषण करीत असताना सभागृहाचे दार उघडून एक दाढीवाला माणूस आत आला. 'मी ऑस्ट्रियन कम्युनिस्ट पक्षाचा प्रतिनिधी आहे' असे त्या माणसाने सांगताच सर्वांनी गर्जना केली–'कॉमिन्टर्नचा विजय असो.'

'कॉमिन्टर्न'चा हा पहिलाच जयघोष होता.

'कॉमिन्टर्न'ची बैठक सुरू असताना लेनिनने मादाम बालाबानोव्ह हिला चिठ्ठी धाडली–'तू व्यासपीठावरून जाऊन इटालियन समाजवादी पक्ष थर्ड इंटरनॅशनलशी संलग्न झाला असल्याची घोषणा कर.'

तिने त्याच चिठ्ठीवर लेनिनला कळविले–'इटालियन समाजवादी पक्षाचे नेमके काय मत आहे हे मला माहीत नसल्यामुळे आपण त्याच्या वतीने घोषणा करणे मला पसंत नाही. एखाद्या इटालियन प्रतिनिधीने तशी घोषणा करावी. मला ही घोषणा करता येणार नाही.'

थोडयाच वेळात लेनिनकडून बालबानोव्ह हिला पुन्हा चिठ्ठी आली–'तुला ही घोषणा केलीच पाहिजे. झिमेरवाल्डची तू अधिकृत प्रतिनिधी असल्यामुळे इटलीत काय चालले आहे हे तुला माहीत आहे असेच सर्वजण मानतात.'

ही चिठ्ठी वाचताच बालाबानोव्ह हिने डोके हलवून आपल्याला ही सूचना मान्य नसल्याचे लेनिनच्या निदर्शनाला आणले. दिवसभर ती गप्पच होती. त्या दिवशीचे कामकाज संपताच तिने युक्रेनला परत जाण्याचे ठरविले. सभागृहातून बाहेर पडताना ती ट्रॉटस्कीला म्हणाली 'बराय, जाते मी.'

ट्रॉटस्कीला काहीच बोध झाला नाही. त्याने विचारले. 'तू कुठं चालली आहेस? कॉमिन्टर्नची चिटणीस म्हणून तुझी नेमणूक होणार आहे हे तुला माहीत नाही काय? तुझ्याशिवाय चिटणीसपदाला कोणीही लायक नाही असं लेनिनचंही मत आहे.'

बालाबानोव्ह चवताळून म्हणाली, 'हा सारा प्रकार म्हणजे एक जबरदस्त फसवणूक आहे. रशियातील युद्धकैद्यांना प्रतिनिधी बनवून हे आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट परिषदेचं नाटक सुरू झालेलं आहे. आपण कम्युनिस्ट पक्षात दाखल झालो तर आपल्याला सवलती मिळतील या आशेने हे सारे युद्धकैदी आपल्या पक्षात दाखल झालेले आहेत. त्यांच्यापैकी एकानंही यापूर्वी कोणत्याही क्रांतिकार्यात वा कामगार चळवळीत भाग घेतलेला नाही. त्यांना समाजवाद म्हणजे काय हे देखील माहीत नाही. राडेक त्यांना सांगतो आहे की या परिषदेनंतर तुम्ही आपापल्या देशात जाऊन रशियाचे हस्तक म्हणून काम करा. त्यांना त्यासाठी पैसेही देण्यात येत आहेत. हा प्रकार मला मंजूर नाही. मी आता लेनिनला भेटून माझं हे मत त्यालाही कळविणार आहे.'

बालबानोव्ह लेनिनच्या कचेरीत गेली. ती लेनिनला म्हणाली, 'दोघा इटालियन युद्धकैद्यांना प्रतिनिधी म्हणून घेण्यात आलेलं आहे. त्यांना तू पैसेही दिले आहेस.

तू त्यांचे अधिकारपत्र आणि पैसे काढून घे. समाजवादाच्या नावाखाली स्वतःचा फायदा करून घेण्यासाठी ते या परिषदेला आलेले आहेत. असे लोक पाठवून कम्युनिस्ट पक्षाच्या इटलीमधील कार्याची हानी होईल.'

लेनिन हसला. तो म्हणाला, 'तिथल्या समाजवादी पक्षाचा धुव्वा उडविण्यासाठी हे लोक उपयोगी पडतील. त्यासाठी हे पैसे दिलेले आहेत. समजलं?'

यानंतर काही दिवसांनी रोमहून प्रसिद्ध झालेल्या बातमीत म्हटले होते– 'लेनिनच्या दोघा प्रतिनिधींनी मॉस्कोहून आणलेले पैसे खाण्यापिण्यात आणि वेश्यांच्या सहवासात उधळून टाकले.'

परंतु असल्या टीकेची लेनिनला पर्वा नव्हती. आपण कोणत्या लायकीची माणसे जवळ करीत आहोत हे त्याला माहीत होते. विरोधकांना नेस्तनाबूत करण्यासाठी कोणाचा कसाही उपयोग करण्याच्या बाबतीत तो मागे पुढे पाहात नसे.

इटलीतील लोकशाहीवादी प्रवृत्तींना आवर घालणे हे कॉमिन्टर्नचे तातडीचे उद्दिष्ट होते. अद्याप इटलीमध्ये फॅसिस्ट पक्ष बलिष्ठ झालेला नव्हता तरीदेखील तेथे लष्कराचे दडपण वाढत चालले होते. अशा परिस्थितीत व्हिक्टर इमॅन्युएल याला पराभूत करून प्रजासत्ताक स्थापन करावे असा विचार भूतपूर्व प्रधानमंत्री फ्रान्सेस्को नित्ती याच्या मनात घोळत होता. या कार्यासाठी नित्ती याने डाव्या पक्षांची मदत घेण्याचे ठरविले. समाजवादी पक्षाचा नेता तुराती याने नित्तीला पाठिंबा देण्याचे कबूल केले. त्यानंतर नित्तीने कम्युनिस्ट पक्षाशी बोलणी सुरू केली. लेनिनचा इटलीतील प्रतिनिधी व्लादिमिर दिओगोट याने उत्तर दिले– 'नित्तीच्या कार्यात भाग घेणे म्हणजे श्रमिक जनतेचा द्रोह करण्यासारखं आहे असं कॉमिन्टर्नचं मत आहे. गादीवर कोण आहे हा आमच्या दृष्टीनं क्षुल्लक प्रश्न आहे. इमॅन्युएल असो, नाही तर नित्ती असो, दोघेही आमचे शत्रू आहेत. आम्हाला जशी राजेशाही नको तशी लोकशाहीही नको. आम्हाला कामगारांची हुकूमशाही हवी आहे.'

नित्तीसारख्या लोकशाहीवाद्याला आपल्या कार्यात यश न आल्यामुळेच मुसोलिनीचा फॅसिस्ट पक्ष इटलीत सत्तारूढ झाला. नित्तीच्या पराभवाला कॉमिन्टर्नचा असहकार मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरला.

जगात कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित करण्याचे ऐतिहासिक काय पार पाडण्यासाठी कॉमिन्टर्नचा जन्म झालेला आहे अशी लेनिनची श्रद्धा होती. त्यामुळे कम्युनिस्ट पक्षाशिवाय इतर सर्व पक्षांचा आणि प्रवृत्तींचा बीमोड कसा होईल या दृष्टीनेच त्याची पावले पडत होती. इटलीत लोकशाही राजवट स्थापन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या नित्तीच्या पराभवात त्याने आनंद मानला तो याच कारणापायी. रशियासारख्या मागासलेल्या देशात आपण कम्युनिस्ट क्रांती घडवून आणली

असल्यामुळे पुढारलेल्या युरोपीय देशातही आपण सहज क्रांती घडवून आणू असा त्याचा विश्वास होता.

त्याने लिहिले आहे– ' कामगारांची आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्याच्या दृष्टीने फर्स्ट इंटरनॅशनलचे (१८६४–७२) कार्य पायाभूत मानावे लागेल. सेकंड इंटरनॅशनलच्या (१८८९–१९१७) कार्याचा पसारा वाढला असला तरी तिच्यातील जोम नाहीसा झाला होता. क्रांतिकारकांऐवजी संधिसाधूंचा तिच्यावर पगडा बसल्यामुळे सेकंड इंटरनॅशनल कोसळली. थर्ड इंटरनॅशनलने सेकंड इंटरनॅशनलचे अपुरे राहिलेले कार्य हाती घेतले असून ही थर्ड इंटरनॅशनल जगभर कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित करण्यासाठी धडपडत आहे. अखेरीस जगात कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित होणार आहे याविषयी मला शंका नाही. परंतु हे कार्य वाटते तितके सोपे नाही याची आम्हाला जाणीव आहे. जगातले पहिले समाजवादी सरकार रशियात अस्तित्वात आलेले आहे. आता अशी सरकारे इतर देशांतही स्थापन होऊ लागतील.'

कॉमिन्टर्नच्या अध्यक्षपदी लेनिनने झिनोव्हेव्हची नियुक्ती केली असली तरी सर्व सूत्रे त्याने स्वत:कडेच ठेवली होती. बोल्शेव्हिक पक्षाप्रमाणे कॉमिन्टर्नमधील शिस्तही अतिशय कडक असली पाहिजे यावर त्याचा कटाक्ष होता. परराष्ट्रात साम्यवादाचा प्रसार करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या कॉमिन्टर्नने आपल्या आदेशानुसारच वागले पाहिजे अशी त्याने जरब बसविली होती.

युरोपमधील इतर देशांमध्ये साम्यवादी राजवट प्रस्थापित झाली नाही तर रशियामधील साम्यवादी राजवटीला धोका उत्पन्न होईल अशी लेनिनला भीती वाटत असल्यामुळेच युरोपमध्ये साम्यवादी क्रांती घडवून आणण्याची घाई त्याला झाली होती.

म्हणून प्रत्येक देशात साम्यवादी पक्ष स्थापन होण्यासाठी लेनिनने आपल्या हस्तकांकरवी पैशाचे अतोनात वाटप सुरू केले.

एवढी धडपड करूनही लेनिनला रशियाव्यतिरिक्त कोठेही साम्यवादी राजवट प्रस्थापित करता आली नाही.

(क्रमश:)




# ऑलिंपिक तत्त्व श्रेष्ठ

ब्राझाव्हिल येथील दोन दिवसांच्या आफ्रिकन सुप्रीम स्पोर्टस् कौन्सिलच्या परिषदेत ३२ आफ्रिकी राष्ट्रांनी येत्या ऑक्टोबरातील ऑलिंपिक स्पर्धांवर बहिष्कार टाकण्याचा एकमुखी निर्णय घेतला आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीने दक्षिण आफ्रिकेला यंदाच्या ऑलिंपिक्समध्ये प्रवेश दिल्यावरून हे वादळ माजू लागले आहे. दक्षिण आफ्रिका अजूनही विविध क्रीडास्पर्धांत वर्णभेदाचे स्तोम माजविते आणि ऑलिंपिकस्च्या मूलभूत तत्त्वांच्या ते अगदी विरुद्ध आहे असे स्पष्ट मत या आफ्रिकी देशांनी व्यक्त केले आहे. जिथे ऑलिंपिक स्पर्धा होणार आहेत त्या मेक्सिकोने व आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या अध्यक्षांनी ( मि. ॲव्हरी ब्रंडेज) परोपरीने वारंवार विनंती करूनही जगातील बहुतेक राष्ट्रे आता दक्षिण आफ्रिकेबरोबर सहकार्य करण्याविरुद्ध उठली आहेत. आपण हा निर्णय "पूर्ण जबाबदारीने आणि कोणतेही राजकारण त्यात न आणता घेत आहोत," असे कौन्सिलने म्हटले आहे. यावरून या प्रश्नाची निकड सर्व देशांच्या मनात किती प्रकर्षाने भासत आहे याची कल्पना येऊ शकेल.

कौन्सिलने पुढे म्हटले आहे की ऑलिंपिक चार्टरच्या १, २४ व २५ या नियमांनुसार दक्षिण आफ्रिका सरकारच्या अलीकडच्या धोरणामुळे तेथील क्रीडा-स्पर्धा व एकंदर क्रीडाक्षेत्रात वर्णभेदाच्या बाबतीत काहीही बदल झालेला आढळून येत नाही आणि त्यांच्या ऑलिंपिक प्रवेशामुळे नियम क्रमांक १ चा मोठ्या प्रमाणावर भंग होत आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीचा हा निर्णय बेजबाबदारपणाचा असून सध्याच्या तेथील प्रतिनिधित्वाची रचनाच चुकीची आहे असा निर्वाळाही

**म नो ह र रे गे**

कौन्सिलने दिला आहे. आंतर राष्ट्रीय क्रीडाक्षेत्रातील एका पुढारलेल्या संस्थेमधील सदस्यांबद्दल आमचा विश्वास आता ढळू लागला आहे अशी तीव्र प्रतिक्रिया कौन्सिलने व्यक्त केली आहे.

आंतरराष्ट्रीय क्रीडाक्षेत्रात व स्पर्धांत वावरताना अलीकडच्या काही वर्षांत दक्षिण आफ्रिकेचे वर्णभेदाचे धोरण हळूहळू ढिले आणि नरमाईचे बनत असले तरी त्याचा पीळ अजून कायम आहे. आफ्रिकी देशांनी जोरदार आवाज उठवून आणि भारताने त्यास पाठिंबा देऊन ऑलिंपिकच्या तत्त्वाचा मोठा पुरस्कार केला असला तरी अजून इंग्लंड-अमेरिकेतील गोरे लोक गप्प बसले आहेत. इंपिरियल क्रिकेट कॉन्फरन्सची इंटरनॅशनल करताना इंग्लंडने दक्षिण आफ्रिकेची सोय पाहिली. किंबहुना 'इंपिरियल' मधून दक्षिण आफ्रिकेस बाहेर काढण्यात आले तरीही त्यांची क्रिकेटची रेकॉर्डस् इंग्लंडने अधिकृत मानली. टेनिस खुले करताना इंग्लंडला पटदिशी अमेरिका, फ्रान्स, दक्षिण आफ्रिकेने पाठिंबा दिला. जोपर्यंत खेळापेक्षाही देशाचे राजकारण किंवा शासनव्यवस्था त्या त्या वेळी प्रभावी ठरते तेव्हाच खेळामध्ये असे तापदायक प्रसंग निर्माण होतात. तेव्हा ऑलिंपिक तत्त्वाचा विचार करताना खेळांचा मूलभूत विचार करणे आवश्यक ठरते. सबंध मानवतेसाठी जेव्हा ऑलिंपिकचे तत्त्व उभे राहते तेव्हा काळ्या-गोऱ्या, गरीब-श्रीमंत अशा भेदभावाला तिथे जागाच उरत नाही. पण क्रीडा-क्षेत्रात हल्ली सर्वत्र लहानमोठे वाद व संघर्ष संकुचित मनोवृत्तीपायी निर्माण झालेले आढळतात. त्यामुळे खेळांची प्रगती खुंटते. जेव्हा अशा जागतिक स्वरूपाच्या क्रीडा-स्पर्धांच्या निमित्ताने हा संघर्ष डोळ्यापुढे येतो तेव्हा त्याची जाणीव तीव्रतेने होते इतकेच. म्हणूनच दक्षिण आफ्रिकेचा ऑलिंपिक-प्रवेश आंतर-राष्ट्रीय ऑलिंपिक समितीने अमान्य करणेच आता इष्ट ठरेल. कारण मेक्सिकोने केलेल्या प्रचंड तयारीमागचे श्रम आणि पैसा केवळ दक्षिण आफ्रिकेमुळे पाण्यात जावेत असे कुणालाही वाटणार नाही. शिवाय अनेक राष्ट्रे जर या जागतिक क्रीडा-स्पर्धेपासून दूर राहिली तर ऑलिंपिकचे तत्त्व आणि सबंध रचनाच कोलमडून पडेल यात शंका नाही. ○


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## १६ ते २२ मार्च राशि-भविष्य

**मेष :** या आठवड्यापासून शनि–मंगळांच्या जोडीला सूर्यही व्ययस्थानी येत आहे. अडचणी आहेतच–त्या थोड्या अधिक वाढू लागतील आणि त्यामुळेच तुमची जिद्द पेटून उठेल. अपयशातूनही यश शोधून काढीन अशा निर्धाराने कार्य करायला लागाल. या सर्वांचा परिणाम असा होईल की, परिश्रमाने का होईना यश निश्चितच मिळेल.

या आठवड्यापासून आपणांस अनारोग्य आणि शत्रुत्व या दोन आघाड्यांवर लढावे लागणार आहे. शेवटी फत्ते तुमचीच होणार आहे यात यत्किंचितही संशय नको.

तात्पर्य अनिष्ट काल ओसरू लागलेला आहे. प्रामुख्याने २०–२१ मार्चपासून आपल्या सर्व योजना आकार घेऊ लागतील.

मार्च १९,२०,२१–अपेक्षा सफल करणारा काल.

**वृषभ :** या वेळी अनेक ग्रहांची तुमच्यावर कृपादृष्टी आहे. सूर्यही लाभस्थानी प्रकटलेला आहे. आता कोणत्याही गोष्टीबद्दल चिंता नको. कित्येक दिवसांत इतका अनुकूल काळ आपण अनुभवलेला नसेल.

उत्साह ओसंडून येईल, ध्यानीमनी नसता फार मोठाले लाभ पदरी पडतील. सांसारिक व्यथाविवंचनांवर प्रभावी तोडगा सापडेल.

साहित्यिकांना, संशोधकांना अनेकांच्या नजरा खिळून राहण्यासारखे नेत्रदीपक यश लाभेल. राजकीय वर्तुळातही तुमची प्रतिष्ठा वाढीस लागेल. आपल्या अंगच्या सुप्त कर्तृत्वाचे दर्शन घडेल. परकीयांचे, परप्रांतीयांचे हार्दिक सहकार्य लाभेल. भंगलेल्या अपेक्षा बऱ्याच प्रमाणात साधल्या जातील.

मार्च १९ ते २१ या कालाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

**मिथुन :** भाग्यदशमातून अनेक समर्थ ग्रह संचारत आहेत. ते तुमचे महत्त्व वाढवतील, तुमच्या अचाट कर्तृत्वाचे जगाला दर्शन घडवतील.

व्यवसायधंद्यातील घसरण थांबेल, भविष्यकालीन प्रगतीची चाहूल लागेल. नव्या व्यवसायाच्या योजना आकार घेऊ लागतील. हुकलेल्या साऱ्या संधी पुन्हा लाभण्याची स्पष्ट लक्षणे दिसायला लागतील.

वरिष्ठांशी दिलजमाई होईल. हव्या त्या ठिकाणी बदली होईल. वृत्तपत्रीय प्रसिद्धी लाभेल, तुमच्या प्रगतीला पोषक असे नवे वातावरण लाभेल.

गेल्या काही महिन्यांतील अपयश धुऊन निघेल न होण्यासारखी कामेही झटपट होऊ लागतील. कालचक्र अनुकूल फिरू लागेल.

१७ ते १९ मार्च सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल.

**कर्क :** शनी, मंगळ, राहू यांच्या जोडीला सूर्यही भाग्यस्थानी आलेला आहे. अगदी गणिताच्या काटेकोर भाषेत बोलायचे झाल्यास–असा काळ तुमच्या हयातीत याच वेळी प्रथम येत आहे आणि म्हणूनच या योगामुळे आपल्या चारित्र्यात अविस्मरणीय घटना घडून येतील.

एकाएकी दूरचा प्रवास घडेल, थोरांच्या साहाय्याने व्यावसायिक स्थान उंचावेल, वैद्यकीय संशोधनक्षेत्रात नेत्रदीपक यश मिळेल.

विरोधक आता सहसा तुमच्या वाटेस जाणार नाहीत. स्थावरासंबंधीचे पेचप्रसंग सुटू लागतील, वाहनही प्रयत्नाने लाभू शकेल.

मंगल कार्याचा प्रश्न लवकरच सुटावा.

दि. १९ ते २१ या काळी घाईगर्दीने अनेक कामे हातावेगळी करावी लागतील.

**सिंह :** शनि-मंगळाच्या अनिष्टतेत सूर्याची आणखी भर. परिस्थितीशी झगडत झगडत तुम्हाला पुढे जावे लागेल. परिश्रम न करता सहजासहजी कामे होतील, ही आशाच नको. शनि-मंगळांची कोंडी फुटेपर्यंत थोडेफार हे असेच चालायचे. सांपत्तिक अडचणीची डोकेदुखी नित्याचीच होऊन बसेल. अपेक्षा करावी एक आणि घडावे वेगळेच असा प्रकार सतत घडायला लागेल.

या वेळी विशेष काळजी घ्यावी लागेल प्रकृतीची. या काळी नको ती माणसे समोरच टपकतील, आणि ज्याची नितांत गरज आहे ती भेटेनाशी होतील.

सारी कामे गतिहीन बनतील. सारे व्यवहार रेंगाळू लागतील. इष्टमित्रांचे सहकार्य मिळेनासे होईल.

नोकरीधंद्यांत सतत दक्षता बाळगा.

दि. १७, १८, २१ या काळी आपले प्रयत्न अगदीच वाया जाऊ नयेत.

**कन्या :** तुमच्या परिस्थितीची तीव्रता अजून निवळलेली नाही. लवकर निवळण्याची लक्षणेही दिसत नाहीत अशी स्पष्टपणे जाणीव देण्याचा हेतू एवढाच की, आलेल्या संकटाशी दोन हात करण्याची तयारी ठेवा. गाफील राहिलात तर अपयशाचे धनी बनाल.

तुमच्या राशीसमोर अनेक कठोर ग्रह जमत आहेत. व्यापार–धंद्यांत, नोकरी–चाकरीत अनेक पेचप्रसंग निर्माण व्हायला लागतील. कौटुंबिक वातावरण याच काली अप्रसन्न बनू लागेल. आणि तुमच्या पडत्या कालाचा फायदा करून घेण्याचा हितशत्रूंचा प्रयत्न सुरू होईल.

वादविवाद वाढवू नका. जरूर पडल्यास माघार घेऊन वेळ निभावून न्या. पदोपदी शत्रुत्व जाणवायला लागेल. पैशाअडक्याच्या व्यवहारात गोंधळ माजू लागेल.

दि. १९ ते २१ या काली काहीसे आशादायक वातावरण दिसू लागेल.

तूळ : सध्याची ग्रहस्थिती अशी चमत्कारिक आहे की, जे जे हवं असेल ते ते घडू लागेल. सांपत्तिक स्थितीही थोडीफार सुधारल्यासारखीच जाणवायला लागेल पण हे सर्व घडत असूनही मानसिक विवंचना कमी काही होत नाहीत. मन त्रस्त व बेचैन बनेल. या अस्वास्थ्याचे निश्चित कारण काय असेल याचाही उलगडा होईनासे होईल.

षष्ठातील ग्रह व्यावहारिक दृष्टीने प्रगतीचे असले तरी धावपळ, धडपड करायला लावणारे असतात.

१९ ला मंगळाचे मेष राशीत आगमन घडताच मानसिक व्यथेत आणखी भर पडेल. मतभेद संघर्ष वाढू लागतील. पैसा हाती भरपूर येऊनही ओढाताण वाढतच आहे अशी सतत जाणीव व्हायला लागेल.

समाधानाची गोष्ट एवढीच की या काली नोकरीधंद्यात एक पाऊल पुढे पडेल. दि. १६ ते १९ या काली अनुकूल गोष्टी घडतील.

वृश्चिक : तुमचे आराध्य दैवत मंगळ. त्याचे गुरूशी घनिष्ट स्नेहाचे नाते निर्माण व्हायला लागलेले असल्यामुळे, आगामी महिन्याभरात तुमच्या व्यावहारिक यशाला उधाण यायला लागेल.

आजवरच्या साऱ्या व्यथा, विवंचना आता मिटायला लागतील आणि सर्वत्र उत्साही व प्रसन्न वातावरण दिसायला लागेल.

हा आठवडा थोडाफार त्रासाचा जाणवेल कुटुंबातील अनारोग्यामुळे याच काली मित्र-हितचिंतकही फारसे सहकार्य करू शकणार नाहीत. आपले राजकीय क्षेत्रातील महत्त्व निरपवादपणे सिद्ध होईल.

यांत्रिक-विद्युत् क्षेत्रात नेत्रदीपक यश मिळवू शकाल.

दि. १७, १९, २१ अनुकूल दिवस.

धनू : चतुर्थ स्थानातील स्फोटक ग्रह तेथून निघून गेल्याशिवाय संपूर्ण स्वास्थ्याची अपेक्षा करायला जागाच नाही तरीसुद्धा हा आठवडा पूर्वीइतकाच त्रासाचा, अस्वास्थ्याचा जाणवू नये. भाग्यस्थ गुरूमुळे तुमच्या चारित्र्यावर परिणाम होईल, असे मात्र काहीच घडणार नाही.

सांपत्तिक खर्चाचा लोंढा थोपविता येणार नाही, प्राप्तीत वाढ होण्यासाठी केलेले परिश्रम वाया जातील. राहत्या जागेच्या कटकटी उत्तरोत्तर वाढतच राहतील, आणि आरोग्यही फारसे चांगले राहणार नाही.

१९ मार्चला मंगळाचे पंचमस्थानी गमन घडताच थोडेफार स्वास्थ्याचे वातावरण दिसायला लागेल.

१७ ते १९ या काली अपेक्षा काही प्रमाणात सफल व्हाव्यात.

**मकर :** सध्या तरी निदान सर्वत्र आघाडीवर दिसू लागतील मकर राशी व्यक्तीच. व्यावसायिक क्षेत्रात, कलाविभागात, चित्रपटसृष्टीत, राजकीय प्रांतातही मकर-राशी व्यक्तींना मुक्त संचार आहे.

कित्येक दिवस स्मरणात राहतील अशा अनंत चांगल्या गोष्टी या काली घडून येतील.

स्थानांतर घडेल, स्थानांतरामुळे अधिकारात व प्राप्तीत वाढ होईल. औद्योगिक क्षेत्रात उत्क्रांती घडवून आणाल. अनेक नवे स्नेहसंबंध जुळून येतील. गेल्या काही दिवसांतील साऱ्या स्थगित कार्यांना याच वेळी जोराची चालना मिळू लागेल.

तुमच्या जीवनातील सर्वोत्तम काळ हाच.

दि. १६ ते १९ मार्चमध्ये अपेक्षासाफल्याच्या घटना घडतील.

**कुंभ :** १९ मार्चला मंगळाचे पराक्रमस्थानी आगमन घडताच आजवरच्या साऱ्या अस्वास्थ्यांना भूतकाळात स्थान मिळेल.

हे दिवस संपूर्ण यशाचे नसले तरी आता आपले अनेक प्रश्न भराभर सुटायला लागतील. बुध-शुक्रांचे आपणास सतत हार्दिक सहकार्य लाभणार असल्यामुळे कला, वैज्ञानिक क्षेत्रात तुमचे महत्त्व वाढू लागेल.

नजीकच्या भविष्यकाळात दूरचा प्रवास घडेल आणि औद्योगिक क्षेत्रात उत्साहाने पदार्पण घडेल. राजकीय क्षेत्रातही तुम्हाला प्रतिष्ठेचे स्थान लाभेल. सांपत्तिक लाभ जरी फार मोठ्या प्रमाणावर झाला नाही तरी तुमच्या अंगीकृत कार्यात कुठेच अडचणी निर्माण होणार नाहीत. १७ ते १९ या कालावर लक्ष केंद्रित करा.


**मीन :** तुमच्या राशीत अनेक उग्र ग्रहांचा धिंगाणा सुरू असल्यामुळे तुमचे स्वास्थ्य उडेल, आरोग्य बिघडेल, परिस्थिती बरीच चिघळेल. जवळ जवळ महिनाभर तरी आपणास प्रतिकूल परिस्थितीशी सतत झगडावे लागणार आहे.

साडेसातीतील हा एक तीव्र खडतर कालखंड आहे. अशा वेळीच संयम–सहनशीलता यांची नितांत गरज भासेल.

आगामी १५–२० दिवसांत फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका. प्रकृतीच्या बारीकसारीक तक्रारींकडेही दुर्लक्ष करू नका. आणि शक्यतो ज्यात संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे अशा गोष्टीत भाग घेऊ नका. सांपत्तिक बाबतीतही विशेष दक्ष राहा.

दि. १९ ते २१ या वेळी घाईगर्दीने अनेक निर्णय घ्यावे लागतील.

○



चवथी सचित्र आवृत्ती


# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

राजहंस प्रकाशन
पुणे

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**